# कर्तबगार शिल्पकार




वामन केशव लेले

श्री. व सौ. बेन्द्रे (लोणावळा)
यांस सप्रेम भेट
वा. के. [illegible]
२५.३.७७

# कर्तबगार शिल्पकार
## केशव बाबुराव लेले

लेखक
वा. के. लेले

# कर्तबगार शिल्पकार
केशव बाबुराव लेले

प्रकाशक
वा. के. लेले
A 1/2 सर्वत्र सोसायटी, पौड रोड, कोथरूड, पुणे - ४११ ०२९

मुद्रक
साप्ताहिक मुद्रण
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११ ०३०

© लेखकाधीन

अक्षरजुळणी
रेखा ढोले
प्रिंट लिंक, ७६९/५, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४

१७ मार्च २००१

खासगी वितरणासाठी

# अभिवादन

भारतीय शिल्पकलेच्या क्षेत्रात इ.स. १९२८ ते १९४५ ह्या दीड तपाच्या कालावधीत 'लेले चित्रकला प्रदर्शना'ला वैशिष्ट्यपूर्ण स्थान होते. जरी ह्याचे नाव चित्रकला प्रदर्शन असे असले तरी प्रत्यक्षात ते शिल्पकला प्रदर्शनच होते. शिल्पकार कै. केशव बाबुराव लेले हे आपल्या हालत्या शिल्पांचे प्रदर्शन तत्कालीन हिंदुस्थानच्या निरनिराळ्या इलाख्यांतील प्रमुख शहरांत मांडत असत. ते पाहण्यास साधारण प्रेक्षकांची तर प्रचंड गर्दी होतच असे, पण समाजाच्या विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती, गव्हर्नरांसारखे सरकारी अधिकारी, राजेरजवाडे व शिक्षणतज्ज्ञही ते प्रदर्शन पाहण्यास आवर्जून जात असत आणि शिल्पकाराच्या असामान्य कलाकौशल्याने प्रभावित व विस्मित होत असत. काही रसिकाग्रणी तर लेले यांना सुवर्णपदकही बहाल करीत असत. खुद्द राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी १९३१ साली लेले चित्रकला प्रदर्शनाला भेट देऊन लेले यांच्या कलानैपुण्याबद्दल परम संतोष व्यक्त केला होता. प्रदर्शनातील हालते पुतळे पाहून आपण कसे मंत्रमुग्ध होऊन जात असू ते सहर्ष सांगणारे वृद्ध प्रेक्षक आजही आढळतात, ही आनंदाची बाब आहे.

कै. के. बा. लेले हे माझे वडील. त्यांचा जन्म १९०१ साली झाला. अर्थात चालू वर्ष हे त्यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. ह्या निमित्ताने एक लहानसे स्मरणपुस्तक प्रकाशित करावे, असे आम्ही सर्व कुटुंबीयांनी ठरविले.

चरित्रलेखनासाठी भरपूर साधने उपलब्ध नसल्याची जाणीव मला अर्थातच होती. कारण माझ्या वडिलांनी बनविलेले पुतळे, त्यांची छायाचित्रे, वडिलांना मिळालेली प्रशस्तिपत्रे इत्यादी साधनांपैकी आता काहीही उरलेले नाही; त्यांच्या समकालीन माहीतगारांपैकीही आता कोणी विद्यमान नाही. अशा स्थितीत माहितीच्या पुढील स्रोतांच्या आधारे मी हे लघुचरित्र लिहिले आहे : १. माझ्या वडिलांनी जपून ठेवलेली व माझ्या धाकट्या बंधूंनी उपलब्ध करून दिलेली तत्कालीन वृत्तपत्रांतील कात्रणे, २. माझे थोरले काका 'कवी मोरया' यांच्या साहित्याची वीस हस्तलिखिते, ३. लेले-कुल-वृत्तान्तातील नोंदी, ४. माझ्या आईने व आत्याने सांगितलेले अनुभव व ५. माझी स्वत:ची संस्मरणे व निरीक्षणे.

पुस्तकाची मुद्रणप्रत तयार झाल्यावर तिचे घरातील आम्ही सर्वांनी साक्षेपाने वाचन केले, पुस्तकात छायाचित्रे व पदके कोठे व कशी छापावयाची ते निश्चित केले आणि त्यानंतर ते सगळे साहित्य मुद्रणादी व्यवस्थेसाठी प्रिंट लिंकच्या संचालिका सौ. रेखा ढोले यांच्या स्वाधीन केले. त्यांनी अतिशय अल्प अवधीत हे पुस्तक देखण्या स्वरूपात

तयार करून दिले त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

आम्ही सर्व लेले कुटुंबीय, आमचे असाधारण पूर्वज व कर्तबगार शिल्पकार कै. केशव बाबुराव लेले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस श्रद्धापूर्वक अभिवादन करतो.

पुणे
फाल्गुन कृष्ण ८, शके १९२२
शनिवार, १७ मार्च २००१

**डॉ. वामन केशव लेले**

## पूर्वज

माझे वडील शिल्पकार कै. केशव बाबुराव लेले यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या देवगड तालुक्यातील मुटाट या गावी फाल्गुन कृष्ण अष्टमी शके १८२२ म्हणजे बुधवार दिनांक १३-३-१९०१ रोजी झाला. मुटाट हे गाव कोल्हापूरपासून सुमारे १०० मैल आणि विजयदुर्गपासून सुमारे २० मैल अंतरावर आहे. ह्या गावाच्या चतु:सीमा अशा आहेत : गावाच्या उत्तरेस खाडी, पूर्वेस मणचे गाव, दक्षिणेस बापर्डे आणि पेंढरे ही गावे आणि पश्चिमेस वाघोटणे हे गाव. मुटाट गावात शेवडकर लेले आणि जोशी लेले अशा लेले घराण्याच्या दोन शाखा आहेत. माझ्या वडिलांचा जन्म शेवडकर लेले शाखेत झाला. ह्या घराण्याच्या ज्ञात मूळ पुरुषाचे नाव अनंत होते. त्यानंतरच्या वंशजांची नावे अशी (अनंत) → गोविंद → बाबदेव → अनंत → धोंडो → अप्पाजी → वामन → बाबुराव. माझ्या वडिलांचे वडील बाबुराव हे मुटाट गावी शेती व सावकारी करीत असत. त्यांची मुटाटात अंत्री भागात एक व अन्यत्र एक अशी दोन लहान शेते होती. ती त्यांनी कुळांकडे कसायला दिली होती. बाबुराव 'ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें। चित्तीं असों द्यावें समाधान।।' ह्या वृत्तीचे असल्यामुळे कुळे जेवढे धान्य आणून देत तेवढ्यावर संतोष मानत असत. ते कुळांना अत्यल्प दराने कर्जाऊ पैसे देत असत. एखाद्या कुळाने कर्जाच्या रकमेची परतफेड न करता रकमेच्या मोबदल्यात एखादी गाय किंवा म्हैस देऊ केल्यास तिचा बाबुराव बिनतक्रार स्वीकार करून कुळाला कर्जमुक्त करीत असत. ते शेतीच्या व सावकारीच्या वसुलीसाठी मुटाटच्या आजूबाजूच्या गावांत होडीने जात असत. बाबुरावांची एकूणच वागणूक अतिशय औदार्याची असल्यामुळे त्यांची प्राप्ती बेताची होती. मूर्तिकला त्यांच्या अंगी उपजत होती. गणेशोत्सवाच्या वेळी ते गणपतीच्या शाडूच्या मूर्ती बनवून व रंगवून आपल्या आप्तेष्टांना विनामोबदला देत असत.

बाबुरावांचे पाळण्यातील नाव भास्कर असले तरी लोक त्यांना बाबुराव ह्या नावानेच संबोधीत असत. त्यांचे तेच नाव रूढ होऊन कागदोपत्रीही लागले. त्यांची मुले त्यांना दादा म्हणत असत. त्यांच्या पत्नीचे नाव वाराणसी असे असून ती पडेल गावाच्या शंकरराव दीक्षितांची मुलगी होती.

बाबुराव-वाराणसी ह्या दांपत्याला गणेश, केशव, विनायक व वासुदेव असे चार मुलगे आणि काशी व येसू ह्या दोन मुली अशी सहा अपत्ये होती. गणेश,

काशी व येसू ही माझ्या वडिलांची तिन्ही भावंडे त्यांच्याहून मोठी होती. काशीचे लग्न मुंबईचे रामचंद्र नारायण दीक्षित यांच्याशी झालेले होते, तर येसू राजापूरच्या शेवडे (आपटे) ह्या घराण्यात दिलेली होती.


## प्रतिभाशाली बंधू कवी 'मोरया'

माझ्या वडिलांचे मोठे भाऊ गणेशराव हे प्रतिभाशाली साहित्यिक होते, किंबहुना ते अष्टपैलू प्रज्ञावान होते. त्यांचा जन्म रत्नागिरीस १८-९-१८९५ रोजी झाला होता. ते जात्या तैलबुद्धीचे होते. त्यांनी मराठी चार इयत्ता व इंग्रजी दोन इयत्ता इतके शिक्षण मुटाटला पूर्ण केल्यावर पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या प्रशालेत १९०६ साली इंग्रजी तिसरीत प्रवेश घेतला. परंतु, त्यांचे शालेय शिक्षण निर्वेधपणे पूर्ण होण्याचा योग नव्हता. कारण ते सातवीमध्ये म्हणजे तत्कालीन मॅट्रिकच्या वर्गामध्ये असतानाच १९१४ सालच्या पूर्वार्धात त्यांचे वडील - बाबुराव वामन लेले - निधन पावले. त्यामुळे गणेशरावांना शाळेला सोडचिठ्ठी देऊन कुटुंबीयांच्या भरणपोषणासाठी अर्थार्जनाचा मार्ग पत्करावा लागला. त्यांनी मुंबईला मेसर्स रामचंद्र ब्रदर्स ॲण्ड कंपनीत कारकुनाची नोकरी धरली. परंतु, त्यांना नोकरीत मुळीच स्वारस्य वाटत नसे. शिवाय, त्यांना मुंबईचे हवामान मानवले नाही. त्यांना १९१८ साली क्षयाचा विकार जडला. त्यामुळे त्यांनी मुंबईची नोकरी सोडली आणि ते विश्रांतीसाठी मुटाटला जाऊन राहिले. तेथेच त्यांचे ५ सप्टेंबर, १९२३ रोजी निधन झाले. मुटाटमधील वास्तव्यात सरस्वती त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिच्या कृपाप्रसादाने त्यांनी १९२० ते १९२३ ह्या सुमारे साडेतीन वर्षांच्या कालावधीत एक पूर्ण नाटक व पाच अपूर्ण नाटके, एक पूर्ण कादंबरी, एक निबंध आणि २५५ पूर्ण व ३२ अपूर्ण मिळून २८७ कविता इतके विपुल साहित्य लिहिले. त्यांनी गद्यलेखन ग.बा. लेले ह्या नावानेच केले, पण काव्यलेखन मात्र 'मोरया' ह्या टोपण नावाने केले. ते गणेशभक्त होते आणि स्वत:ला मोरयाचे दासानुदास म्हणवून घेत असत. आपला कवितासंग्रह प्रसिद्ध करावयाचा झाल्यास तो 'वाग्विलास' ह्या नावाने प्रसिद्ध करावा अशी अपेक्षा त्यांनी 'अर्पणपत्रिका' व 'रसिकांना विनंती' ह्या दोन पद्यांत नमूद करून ठेवली होती. त्यांच्या आठ-दहा कविता त्यांच्या हयातीत 'नवयुग', 'मधुकर' इत्यादी तत्कालीन मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या होत्या. मोरयांनी कवी आणि काव्य, देशाची स्थिती, व्यक्ती व समाजजीवन, कुटुंबसंस्था, प्रेमविवाह, मनुष्यस्वभाव, व्यवहारनीती, तत्त्वचिंतन, इत्यादी विविध विषयांवर वेगवेगळ्या वृत्तांमध्ये अतिशय प्रासादिक व श्रुतिमधुर कविता लिहिल्या होत्या. त्यांच्या निवडक ७० कवितांचा संग्रह प्रस्तुत चरित्र-लेखकाने १९८८ साली 'वाग्विलास' ह्या शीर्षकाने प्रसिद्ध केला. वर लिहिल्याप्रमाणे मोरया ऐन तारुण्यात क्षयरोगजर्जर

झाले, त्यामुळे त्यांना नोकरी सोडावी लागली. स्वाभाविकपणे कुटुंबपोषणाची जबाबदारी त्यांच्या धाकट्या बंधूंवर म्हणजेच माझ्या वडिलांवर येऊन पडली. अत्यंत निर्व्याज मनाच्या 'मोरयां'नी आपल्या धाकट्या भावाविषयीची कृतज्ञता एका कवितेखालील गद्य मजकुरात प्रांजलपणे व्यक्त केली असून 'प्रेमनिधान' हे आपले पहिले नाटक त्याला अर्पण केले आहे. ('मोरया' कवींची समस्त हस्तलिखिते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या ग्रंथालयात जतन करून ठेवण्यात आली आहेत.) गणेशराव नट, गायक व आपल्या वडिलांप्रमाणे उत्तम मूर्तिकारही होते.

## के.बा. लेले यांची राशिकुंडली

माझ्या वडिलांचे कृष्णधवल अस्सल छायाचित्र माझ्यापाशी आहे. तेच प्रस्तुत पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापले आहे. त्या छायाचित्रावर माझ्या वडिलांची K.B. Lele अशी सही असून तिच्या खाली 10-31-26 Philadelphia Pa. U.S.A. अशी त्यांनी स्वहस्ते केलेली नोंद आहे. तिच्यावरून हे छायाचित्र फिलाडेल्फिया येथे ३१ ऑक्टोबर १९२६ रोजी काढलेले होते, हे लक्षात येते. त्याच छायाचित्राखाली (माउंटवर) Born on 13.3.1901 व Died on 5.1.1945 अशा तारखांच्या तैलरंगातील नोंदी आहेत. ह्यांपैकी पहिली म्हणजे जन्मतारखेची नोंद माझ्या वडिलांच्या पारपत्राच्या आधारे केलेली आहे (ते पारपत्र त्यांच्या निधनानंतरही अनेक वर्षे दादर येथील आमच्या निवासस्थानी होते.) दुसऱ्या नोंदीतील घटना त्यांच्या सर्वच नातलगांनी प्रत्यक्षात पाहिलेली आहे. ह्यांपैकी जन्मतारखेची नोंद माझ्या वडिलांची राशिकुंडली बनविण्यास उपयुक्त ठरली. माझे मित्र श्री. शरच्चंद्र शिवराम रानडे यांनी १९०१ सालचे पंचांग उपलब्ध करून दिले. त्याच्या आधारे एका ज्योतिषांनी माझ्या वडिलांची राशिकुंडली तयार करून दिली. ती खाली देत आहे.




वृश्चिक रास, ज्येष्ठा नक्षत्र, आद्य नाडी, मृग योनी, राक्षस गण

माझ्या वडिलांची जन्मवेळ ठाऊक नसल्यामुळे त्यांची जन्मकुंडली मांडता येत नाही.

## नोकरीतील उमेदवारी

माझ्या वडिलांचे मुटाटला मराठी चार इयत्ता व इंग्रजी दोन इयत्ता इतके शिक्षण झालेले होते. त्यानंतरचे रीतसर शिक्षण ते संपादू शकले नाहीत. कारण वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांना अर्थार्जनाचा मार्ग पत्करावा लागला होता. त्यासाठी ते मुंबईला गेले आणि तेथे हरी पांडुरंग लेले यांच्या सेवेत रुजू झाले. ह.पां. लेल्यांची पेढी होती. त्या पेढीवर माझ्या वडिलांना हरप्रकारचे काम करावे लागत असे. परंतु त्यांना निसर्गत:च शिल्पकलेत गोडी होती. त्यांचे वडील व मोठे बंधू मूर्तिकार असल्याचा निर्देश वर केलाच आहे. त्यामुळे माझ्या वडिलांनी पेढीवरची नोकरी सोडली आणि वसईचे विख्यात शिल्पकार कै. रघुनाथ कृष्ण फडके यांच्या स्टुडिओत नोकरी धरली. अशा प्रकारे माझे वडील फडक्यांचे शिष्य झाले. फडके मेणाचे पूर्णाकृती हालते पुतळे बनवून त्यांची प्रदर्शने भरवीत असत. मुंबईला सी.पी. टँकजवळ रामबागेत दरवर्षी असे प्रदर्शन भरत असे. ते बघण्यास प्रेक्षकांची अलोट गर्दी होत असे. हे प्रदर्शन इतके लोकप्रिय झालेले होते की, ते कधी उघडणार, किती दिवस चालणार, केव्हा बंद होणार इत्यादीबद्दलची माहिती वृत्तपत्रांत छापून येत असे.[१] अशा प्रथितयश कलावंताच्या मार्गदर्शनाखाली माझ्या वडिलांचे शिल्पकलेचे शिक्षण झाले. त्यांनी हालते पुतळे बनवण्याची व ते प्रदर्शनात मांडण्याची कला फडके यांच्याकडून उत्तम प्रकारे शिकून घेऊन आत्मसात केली. त्यांची ही उमेदवारी १९१८ ते १९२५ अशी सुमारे सात वर्षे चालू होती.

## इंग्लंडला प्रयाण


१९२५ साली इंग्लंडमध्ये वेम्ब्ले (Wembley) येथे फार मोठे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यात आले होते. विविध देशांतील उद्योजकांना व कलावंतांना ह्या प्रदर्शनाचे निमंत्रण धाडण्यात आले होते. त्यांनी आपापल्या कौशल्याच्या वस्तू त्या प्रदर्शनात मांडाव्यात असे त्यांना आवाहन करण्यात आले होते. तदनुसार फडके यांनीही आपली मेणाची हालती चित्रे त्या प्रदर्शनात मांडावीत अशी विनंती त्यांना करण्यात आली होती. परंतु, काही कारणामुळे फडके यांनी इतका लांबचा बोटीचा प्रवास करण्यास नकार दिला आणि इंग्लंडला जाण्यास माझ्या वडिलांना प्रवृत्त केले. माझ्या वडिलांनी होकार भरला, आवश्यक त्या कपड्यालत्त्यांची खरेदी केली (ही घटना माझे ज्येष्ठ स्नेही व प्रसिद्ध नट श्री. अनंतराव वर्तक अजूनही आठवणींने सांगतात.) आणि इंग्रजी संभाषण-कलेवरची पुस्तके खरेदी केली. एवढी जय्यत तयारी करून माझे वडील Prof. Phadke's Fine Art

Works चे व्यवस्थापक म्हणून इंग्लंडला रवाना झाले. त्यांनी व्यवस्थापनाचे कार्य अतिशय प्रभावीपणे केले. तेथे त्यांच्या हाताखाली तीन इंग्रज पुरुष व तीन इंग्रज स्त्रिया असे सहा नोकर होते. वेम्ब्ले प्रदर्शनात फडके यांच्या कलाकौशल्याची खूप वाहवा झाली. त्या प्रशंसेचा 'काही वाटा रा. लेले यांसही आहेच', असे मुंबईच्या 'विविधवृत्ता'ने २३.११.१९२७ च्या अंकात आवर्जून नमूद केले होते. मुंबईच्याच Herald ह्या दैनिकाने तर ११ नोव्हेंबर १९२७ च्या अंकात माझ्या वडिलांचा उल्लेख a Wembley man म्हणून केला होता. एकंदरीने वेम्ब्ले प्रदर्शनाने फडके यांना उत्कृष्ट शिल्पकार म्हणून आणि माझ्या वडिलांना उत्कृष्ट व्यवस्थापक म्हणून उज्ज्वल कीर्ती मिळवून दिली. फडके यांना आर्थिक लाभही भरपूर झाला होता. वेम्ब्ले प्रदर्शनाच्या निमित्ताने माझ्या वडिलांचे इंग्लंडमध्ये सुमारे सात महिने वास्तव्य होते.

## अमेरिकेस जाण्याची संधी

माझे वडील हिंदुस्थानात परत आल्यावर त्यांना लगेच पुढच्या वर्षी म्हणजे १९२६ साली अमेरिकेला जाण्याची संधी चालून आली. अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाल्यास १९२६ साली दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने फिलाडेल्फिया येथे एक प्रचंड प्रदर्शन भरविण्यात आले होते. १८७६ पासून १९१५ पर्यंत अमेरिकेत अशा प्रकारची फार मोठी दहा-अकरा प्रदर्शने भरविण्यात आली होती.

फिलाडेल्फियाला गेलेले भारतीय उद्योजक - डावीकडून तिसरे शिल्पकार के. बा. लेले



Daily News 21st May, 1926

परंतु त्या सर्वांपेक्षा फिलाडेल्फियाचे १९२६ सालचे प्रदर्शन अक्षरश: जगड्व्याळ होते, हे खालील तपशिलावरून लक्षात येईल.

## फिलाडेल्फियातील जगड्व्याळ प्रदर्शन

या प्रदर्शनाने सुमारे साडेसातशे एकर जमीन व्यापली होती. जगातील जवळजवळ सर्व राष्ट्रांनी ह्या प्रदर्शनात भाग घेऊन आपापल्या पद्धतीनुसार एकेक इमारत बांधून तिच्यात आपापली सर्व प्रकारची उत्पादने आकर्षक रीतीने प्रदर्शित केली होती. उदाहरणार्थ, जपानने ह्या प्रदर्शनात जमिनीचा एक तुकडा घेऊन त्याच्यावर जपानी पद्धतीची टोलेजंग व सुंदर इमारत बांधली होती. त्या इमारतीत जपानमध्ये उत्पादित होणाऱ्या सर्व उत्कृष्ट वस्तूंचे नमुने व्यवस्थितपणे मांडून ठेवलेले होते.[२]

## विशाल विभाग

ह्या प्रदर्शनात एकाहून एक विशाल असे अनेक विभाग होते. त्यांपैकी एक विभाग यांत्रिक वस्तूंचा होता. त्यात विमानांची व आगगाड्यांची इंजिने, मोटमोठ्या जहाजांचे लहान आकाराचे बनवलेले नमुने व इतर नानाविध लहानमोठी यंत्रे मांडलेली होती. १९२६ पूर्वीच्या दीडशे वर्षांच्या काळात यांत्रिक सुधारणा निरनिराळ्या दिशांनी कसकशा होत गेल्या त्यांचा इतिहास वेगवेगळ्या काळांतील यंत्रे एकाशेजारी एक मांडून दाखवण्यात आला होता. वाहतुकीच्या निरनिराळ्या साधनांमध्ये दीडशे वर्षांच्या कालावधीत कोणकोणती स्थित्यंतरे झाली त्याचे यथार्थ ज्ञान व्हावे अशी मांडणी करण्यात आली होती. याच दालनात अमेरिकन सरकारच्या अनेक लोकोपयोगी खात्यांतील सुधारणांचा इतिहास आकडे, चित्रे, प्रमाणदर्शक नकाशे व रंगीबेरंगी दिवे यांच्या साहाय्याने प्रेक्षक-वर्गापुढे ठेवलेला होता. प्रत्येक कारखानदाराने आपल्या कारखान्याची कल्पना देण्याकरता आपल्या प्रदर्शनाला जोडून आपल्या कारखान्याचे चित्रपट सतत चालू ठेवले होते.[३]

ह्यानंतरच्या विभागात शिक्षणसंस्थांच्या प्रगतीची रूपरेखा दाखवण्यात आली होती. अमेरिकेतील मोठमोठी विश्वविद्यालये, वाचनालये, औद्योगिक व व्यापारी संस्था यांच्या अभिवृद्धीचा इतिहास ह्या विभागात संगृहीत केलेला होता. कोणत्या संस्थेतून किती विद्यार्थी शिकून बाहेर पडले, त्या संस्थेत कोणते शिक्षण दिले जाते, विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक शिक्षणाची कशी काळजी घेतली जाते, त्या-त्या संस्थेचे वैशिष्ट्य काय, त्या संस्थेत विशेष नामांकित कोणत्या व्यक्ती होऊन गेल्या, या व अशा विविध गोष्टींची माहिती सहज व सुलभ साधनांच्या मदतीने प्रेक्षकांना मिळेल अशा प्रकारे प्रदर्शित करण्यात आली होती. त्या माहितीवरून हे स्पष्ट होत होते की, शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत मुलांच्या बरोबरीने मुलींची संख्या होती.[४]

## प्रचंड इमारती

आणखी एका प्रचंड इमारतीत हस्तकला, शिल्पकला इत्यादी अनेक कलाकौशल्यांच्या वस्तू आकर्षकपणे मांडण्यात आल्या होत्या. सुंदर नक्षीची कामे, सुबक विणकाम, चिनीमातीवरील रंगीबेरंगी व मनमोहक कामे, खोदीव काम इत्यादींचे वेचक नमुने ह्या इमारतीत ठेवण्यात आले होते.[५]

प्रत्येक इमारतीतील समस्त प्रदर्शित वस्तू पाहण्यास निदान एक दिवस सहज लागत असे. अमेरिकेच्या इमारतींखेरीज पर्शिया, रशिया, हिंदुस्थान, इजिप्त, जपान, चीन इत्यादी देशांनी आपापल्या देशांतील प्रदर्शनीय वस्तूंसाठी स्वतंत्र व मोठमोठ्या इमारती बांधल्या होत्या. तसेच अमेरिकेतील प्रत्येक राज्यानेही आपापल्या राज्याची म्हणून स्वतंत्र इमारत बांधली होती. ह्या राज्यांनी आपापल्या राज्यातील इतिहासप्रसिद्ध पुरुषांची तसेच ऐतिहासिक स्थळांची घरेही उभारली होती. त्याखेरीज अमेरिकेतील राष्ट्रीय स्त्री-संघाने 'हायशीट' नावाचा एक रस्ता तयार केला होता. त्या रस्त्याच्या दुतर्फा जॉर्ज वॉशिंग्टन, बेंजामिन फ्रँकलिन, थॉमस जेफरसन इत्यादी थोर देशभक्तांची सुमारे पन्नास घरे, त्यांच्या जुन्या राहत्या घरांबरहुकूम, उभारली होती.[६]

## सभागृहे व क्रीडांगणे

तीस-चाळीस हजार माणसे बसतील एवढे मोठे सभागृह व दीड लाख माणसे भोवताली बसून खेळ पाहू शकतील असे क्रीडांगण ह्या दोन इमारती अतिशय भव्य होत्या. सदरहू सभागृहामध्ये अनेक शास्त्रीय, औद्योगिक, सामाजिक व राजकीय विषयांचा विचारविनिमय करण्यासाठी परिषदा व संमेलने भरविण्यात येत असत. क्रीडांगणावर दररोज रात्री स्वातंत्र्य नावाचा कार्यक्रम दाखविण्यात येत असे. त्यात हजारो अमेरिकन नट व नटी सहभागी होऊन अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त कसे झाले ते अभिनयाद्वारे दाखवीत असत. दिवसा त्या क्रीडांगणावर प्रसिद्ध खेळाडूंचे फूटबॉल, बेसबॉल वगैरे खेळांचे सामने होत असत. त्या क्रीडांगणावर २३.९.१९२६ रोजी जॅक डेम्सी व टनी या दोन मुष्टियोद्धांमध्ये सामना झाला. त्या सामन्याला १ लाख ४० हजार प्रेक्षक उपस्थित होते व त्यांपैकी हजारो जण खूप दूरदूरच्या ठिकाणांहून आले होते. त्या सामन्याच्या वेळी मिनिटामिनिटाच्या खेळाचा निकाल बिनतारी यंत्राद्वारे अमेरिकेच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वत्र जाहीर करण्यात येत होता. त्या सामन्यात टनी हा मुष्टियोद्धा विजयी झाला होता.[७]

त्या प्रदर्शनात उन्हाळ्यात हजारो स्त्री-पुरुषांना ज्यात पोहता येईल असा प्रचंड तलाव बांधण्यात आला होता.[८]

फिलाडेल्फिया प्रदर्शनात सुमारे शंभर एकर जमिनीवर करमणुकीचा एक स्वतंत्र

विभाग तयार करण्यात आला होता. त्यात शेकडो प्रकारची करमणुकीची साधने होती. शिवाय प्रदर्शनाला येणाऱ्या प्रेक्षकांना विमानप्रवासाची सोयही उपलब्ध करून देण्यात आली होती. प्रदर्शनावरील अंतरिक्षात त्या विमानांच्या घिरट्या सतत चालू असत. लहानलहान होड्यांत बसून जलविहार करता यावा ह्यासाठी एक मैल लांबीचे एक सुंदर सरोवर ह्या करमणुकीच्या विभागात तयार करण्यात आले होते. त्या सरोवराच्या मध्यभागी एक नयनमनोहर व महाकाय कारंजे उभारण्यात आले होते. त्यामधून पाण्याचे रंगीबेरंगी फवारे अहोरात्र उडत असत.[९]

## भारतीय दालन

तत्कालीन हिंदुस्थान सरकारने ह्या जागतिक प्रदर्शनासाठी कोणतीच व्यवस्था केली नव्हती. ही उणीव भरून काढण्याकरिता लंडनमधील ताजमहाल ट्रेडिंग कंपनी पुढे आली. तिने सुमारे सहा लाख रुपये खर्च करून ताजमहालाच्या आकाराची एक सुंदर इमारत बांधून दिली आणि हिंदी कलाकौशल्य व कारागिरी जगापुढे ठेवण्याची सोय उपलब्ध करून दिली. ही इमारत प्रदर्शनास येणाऱ्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत असे.[१०]

पंधरा व्यापाऱ्यांनी दोन लाख रुपये भाडे भरून हिंदी विभागात आपली दुकाने थाटली होती. त्यांत सुमारे पंचवीस लाख रुपयांचा हिंदुस्थानी कलाकौशल्याचा माल विक्रीस ठेवण्यात आला होता. ह्या दालनात हिंदी अरण्याची प्रतिकृती उभारण्यात आली होती; जादूच्या प्रयोगांसाठी एक प्रेक्षागृह बांधण्यात आले होते; पाच-सहाशे माणसे एका वेळेस बसू शकतील एवढे मोठे एक उपाहारगृहही उघडण्यात आले होते.[११]

## प्रदर्शनाचे प्रशासन

ह्या प्रदर्शनाच्या दैनंदिन देखरेखीसाठी तीन हजार स्त्री-पुरुष सेवकांची नेमणूक करण्यात आली होती. विशेष महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीच्या तसेच खास कार्यक्रमाच्या दिवशी सेवकांची संख्या पाच हजारपर्यंत पोचत असे. संपूर्ण प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सरसंचालकांवर (ह्यांना Director-in-chief हा हुद्दा होता.) सोपविण्यात आली होती आणि त्यांच्या दिमतीला कार्यवाह, संख्याशास्त्रज्ञ इत्यादी इतर अधिकारी होते. हे विराट प्रदर्शन ३१ मे १९२६ रोजी सुरू झाले आणि ३० नोव्हेंबर १९२६ रोजी समाप्त झाले. ह्या सहा महिन्यांच्या कालावधीत एकूण ४६,२२,२११ स्त्री-पुरुष प्रेक्षकांनी तिकिटे काढून प्रदर्शन बघितले.[१२]

प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश-फी फक्त पन्नास सेंट ठेवण्यात आली होती.

प्रदर्शनात प्रवेश केल्यानंतर निरनिराळ्या राष्ट्रांच्या इमारतींत प्रवेश करण्यासाठी वेगळी फी ठेवण्यात आली नव्हती. परंतु हिंदुस्थानच्या वतीने वर उल्लेखिल्याप्रमाणे बांधण्यात आलेल्या 'ताजमहाला'त प्रवेश करण्यासाठी दहा सेंट प्रवेश-फी ठेवण्यात आली होती. त्या इमारतीसाठी जो खर्च करावा लागला होता तो काही अंशी तरी भरून निघावा ह्या हेतूने ही फी ठेवण्यात आली होती. ती देऊनही रोजच्या रोज हजारो स्त्री-पुरुष हिंदी कलाकौशल्य पाहण्यासाठी येत असत.[१३]

## फिलाडेल्फिया महाप्रदर्शनातील फडके यांचे प्रदर्शन

फिलाडेल्फियाच्या महाप्रदर्शनात फडके यांच्या हालत्या मेणाच्या चित्रांचे प्रदर्शन ठेवण्यात आले होतेच. ते पाहण्यासाठी प्रेक्षकांचे थवेच्या थवे लोटत असत. त्या प्रदर्शनातील महात्मा गांधींचे ऑपरेशन,[१४] महात्माजींचा कारागृहवास, देशबंधू दास ह्या शिल्पकृती प्रेक्षकांच्या प्रशंसेचा विषय झाल्या होत्या. महात्मा गांधी, देशबंधू चित्तरंजन दास या हिंदी पुढाऱ्यांची कीर्ती अमेरिकेतील बहुसंख्य लोकांच्या कानांवर गेलेली असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचे सौख्य जरी अनुभवता आले नाही, तरी निदान त्यांच्या प्रतिमा पाहाव्यात ह्या हेतूने अमेरिकन स्त्री-पुरुष प्रेक्षक प्रदर्शन पाहण्यासाठी मोठ्या संख्येने जात असत आणि शिल्पकाराचे कौतुक करीत असत.[१५]

फिलाडेल्फियाचे मेयर हे प्रदर्शन पाहण्यासाठी गेले होते तेव्हा ते इतके काही खुश झाले होते की, त्यांनी प्रदर्शनातील शिल्पांसंबंधी अनेक बड्याबड्या अमेरिकन गृहस्थांजवळ व गव्हर्नरांसारख्या अधिकाऱ्यांजवळ शिफारस करून त्यांना प्रदर्शन पाहण्याची आग्रहाची सूचना केली होती. इतकेच नव्हे, तर त्यांनी काही व्यक्तींना आपल्याबरोबर प्रदर्शनास नेलेही होते. प्रदर्शनातील मूर्तींच्या उत्कृष्टपणाबद्दलचे एक प्रशस्तिपत्र मेयरसाहेबांनी स्वहस्ते लिहून ते माझ्या वडिलांकडे फडके यांना देण्यासाठी दिले होते.[१६]

ह्या बाबतीत एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. ती गोष्ट अशी की, अमेरिकन स्त्री-पुरुष हे प्रदर्शन पाहण्यास खूप मोठ्या संख्येने दररोज येत असत आणि फडके यांच्या शिल्पांची मुक्तकंठाने तारीफ करीत असत हे जरी खरे असले तरी अनेकांच्या मनात ही शिल्पे हिंदुस्थानातच झाली आहेत काय, अशी शंका येत असे. अशा प्रसंगी संबंधित प्रेक्षकांची खात्री पटवण्याकरता माझे वडील वेम्ब्लेमध्ये मिळालेले गौरवपत्र पुढे करीत असत. ते वाचून प्रेक्षक आश्चर्यचकित होत असत आणि त्यांचा संशय फिटत असे.[१७]

फडके यांचे प्रदर्शन १.७.१९२६ रोजी सुरू झाले व ३०.११.१९२६ रोजी बंद झाले.

## महाप्रदर्शनातील हिंदुस्थानी दालन

हिंदी दालनात फडके यांच्या मेणाच्या चित्रांखेरीज मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार परांडेकर, हळदणकर व कुळकर्णी यांच्या चित्रांचे (पेंटिंग्ज्‌चे) उत्कृष्ट नमुनेही ठेवण्यात आले होते व तेही कलाप्रेमी प्रेक्षकांच्या कौतुकास पात्र ठरले होते.[१८]

प्रदर्शनात एक व्हिजिटर्स बुक ठेवण्यात आले होते. ज्यांना प्रदर्शन आवडले त्यांनी त्या बुकात आपली सही करून आपला अभिप्राय लिहून ठेवावयाचा होता. ते बुक हजारो अमेरिकन स्त्री-पुरुषांनी आपापल्या सह्यांनी भूषविले होते. त्यावरून एकूण हिंदी चित्रकलेविषयी अमेरिकन लोकांना किती आवड वाटत होती, ते कळून आले. फिलाडेल्फिया, न्यूजर्सी, शिकागो वगैरे ठिकाणच्या गव्हर्नरांनी या प्रदर्शनास भेट देऊन आपली गुणग्राहकता प्रदर्शित केली होती.[१९]

माझ्या वडिलांनी अमेरिकेहून परतीचा प्रवास पॅरिसपर्यंत Majestic नावाच्या बोटीने केला. ते पॅरिसला ७ जानेवारी १९२७ ला पोचले. तेथील वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली होती :-

'फिलाडेल्फिया प्रदर्शनाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू प्रदर्शन मार्च १९२७ मध्ये पुन्हा एकदा उघडून ते नोव्हेंबरपर्यंत चालू ठेवण्याचे ठरविले आहे. आम्ही पुन्हा अमेरिकेस प्रदर्शनासाठी येणार आहोत. आमच्या असे लक्षात आले आहे की, अमेरिकन लोकांना हिंदी कलेमध्ये खूप रस आहे. त्यामुळे आम्ही अमेरिकेत एक केंद्र उघडण्याचे ठरविले आहे.'[२०]

पॅरिसपासून पुढचा प्रवास माझ्या वडिलांनी राजपुताना बोटीने केला आणि ते २८ जानेवारी १९२७ रोजी मुंबईला पोचले.[२१]

फिलाडेल्फिया प्रदर्शनात त्यांनी फडके यांच्या प्रदर्शनाचे व्यवस्थापक व हिंदी दालनाचे सरव्यवस्थापक अशा दुहेरी नात्याने भाग घेतला होता. ह्या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी सारख्याच कौशल्याने पेलल्या. त्यांनी व्यवस्थापन व संघटन अशी दोन्ही नैपुण्ये उत्तम प्रकारे आत्मसात केली. त्यांना फिलाडेल्फियाच्या प्रदर्शनातून बरेच शिकावयास मिळाले. अशी व्यापक प्रदर्शने केवळ मनोरंजनासाठी व आनंदासाठी भरवण्यात येत नसतात ह्याची त्यांना जाणीव झाली. एकीकडे लोकांच्या मनात कलाविषयक जाणिवा उत्पन्न करावयाच्या व दुसरीकडे त्यांना शास्त्रज्ञानसंमुख करावयाचे, हा अशा प्रदर्शनांचा एक उद्देश असतो. तर दुसरीकडे कला व शास्त्रे यांचा विकास साधावयाचा, असा दुसरा उद्देश असतो.[२२] हे दोन्ही उद्देश माझ्या वडिलांच्या मनावर खोलवर ठसले. म्हणूनच त्यांनी १९२७ सालच्या अखेरीस मुंबईला रामबागेत एका मोठ्या कलाप्रदर्शनाचे बुद्धिपुरस्सर आयोजन केले. त्याचीच माहिती आता देतो.

## संमिश्र कलाप्रदर्शनाची जाहिरात

विविध कलांच्या प्रदर्शनाचा हा उपक्रम अभिनव असल्यामुळे मुंबईच्या 'क्रॉनिकल' दैनिकाला त्याची आवर्जून दखल घ्यावीशी वाटली होती व त्या दैनिकाने आपल्या वाचकांना ह्या प्रदर्शनाची आगाऊ सूचना १४.१०.२७ च्या अंकात पुढील शब्दांत दिली होती.

> 'Mr. Lele is shortly opening an exhibition at Ram Bagh, first on such lines.
>
> 'The features of this exhibition will be the wax figures of the well-known artist Mr. Phadke of Bombay, works of art by other eminent painters and sculptors and also a section for the show of artistic skill of womens - needlework and embroidery, etc. There will be similarly a section to include specimens of old Indian art and relics, as a special feature.'

'नवा काळ' ह्या मराठी दैनिकानेही ह्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाची बातमी आपल्या १२.१०.१९२७ च्या अंकात खालीलप्रमाणे दिली होती :

> **चित्रकला प्रदर्शन**
>
> 'आज सायंकाळी चित्रकला प्रदर्शन रामबाग सी.पी. टँक येथे ५ वाजता उघडेल व रोज सकाळी १० ते रात्रौ ११ वा. पर्यंत उघडे राहील. ह्यात सुप्रसिद्ध चित्रकारांची कामे ऑइल कलर पेंटिंग्ज, वॉटर पेंटिंग्ज, पेस्टल वर्क्स, फोटोग्राफी, स्त्रियांची कलाकौशल्याची कामे व फडके यांच्या मेणाच्या चित्रांचे मनोरंजक देखावे असून दुसरीही अनेक कलाकौशल्याची कामे ठेवण्यात आली आहेत. प्रवेश फी ४ आणे आहे, असे चित्रकला प्रदर्शनाचे व्यवस्थापक कळवितात.'

एकंदरीने हे विविधकला-प्रदर्शन मुंबईच्या सांस्कृतिक जीवनातील विशेष घटना होती.

## कला-प्रदर्शनाचे स्वरूप

रामबागेतील प्रदर्शन उघडल्यानंतर द टाइम्स ऑफ इण्डिया (मुंबई, २.११.२७), मौज (मुंबई, ५.११.२७), श्रद्धानंद (मुंबई, १०.११.२७), केसरी (पुणे, १०.११.२७) विविधवृत्त (मुंबई, २३.११.२७) इत्यादी नियतकालिकांनी नामांकित चित्रकारांच्या अत्यंत प्रेक्षणीय कलाकृतींची थोडक्यात माहिती देऊन हे प्रदर्शन पाहण्याची आग्रहाची शिफारस आपापल्या वाचकांना केली होती. मुंबईच्या 'नवा काळ' ने आपल्या ७.११.२७ च्या अंकात ह्या प्रदर्शनाचा विस्तृत वृत्तान्त पुढीलप्रमाणे दिला होता :

नवा काळ ७.११.२७

**'रामबागेतील चित्रकला प्रदर्शन**

'येथे रामबागेत (सी.पी. टँक, गोपाळदास बर्फीवाले यांच्या शेजारी) श्री. के.बी. लेले ह्यांनी येथील निरनिराळ्या नामांकित चित्रकारांची चित्रे मिळवून त्यांचे एक प्रदर्शन गुरुवारी उघडले असून ते अनेक दृष्टींनी प्रेक्षणीय झाले आहे. या प्रदर्शनात श्री. एम.व्ही. धुरंधर, मि. त्रिदांड, श्री. चुडेकर, श्री. लाड, श्री. परांडेकर, श्री. एम.ए. जोशी, मि. नगरकर, श्री. सावर्डेकर, एम.कृष्णराव, श्री. देसाई, श्री. तळवडेकर, मि. मिठावाला, मि. पेस्तनजी बमनजी, श्री. डी.के. म्हात्रे, श्री. चाफळकर वगैरे सुप्रसिद्ध चित्रकारांची ऑईल, वॉटर व पेस्टल कलरची निवडक चित्रे ठेवण्यात आली असून शिवाय सुप्रसिद्ध चित्रकार श्री. फडके यांची म. गांधींचे ऑपरेशन, महात्माजींचा एकांतवास, राजकारणातील नंदी बैल वगैरे लोकप्रिय झालेली मेणाची हालती चित्रेही ठेवण्यात आली आहेत; शिवाय काही फोटोग्राफर्सची निवडक व दर्शनीय कामे (ठेवण्यात) आली असून सुप्रसिद्ध शिल्पकार श्री. तालीम यांची शिल्पकलेची काही कामे ठेवण्यात आली आहेत.

'या प्रदर्शनाचा दुसरा विशेष म्हणजे खास स्त्रियांनी केलेली चित्रकलेची, त्याचप्रमाणे शिवणकाम, विणकाम व पेन पेंटिंग्जची कामे महत्प्रयासाने मिळवून ठेवण्यात आली आहेत. त्याचबरोबर जुन्या काळाच्या चित्रकलेची ओळख व्हावी या हेतूने काही जुनी पेंटिंग्जही ठेवण्यात आली आहेत.

'एकंदरीत चित्रकलेतील बहुतेक शाखांचा या प्रदर्शनात समावेश करण्यात आला असून अवघ्या चार आण्याच्या तिकिटात नामांकित चित्रकारांच्या बहुमोल कृती एकाच ठिकाणी पाहण्याची सोय या

प्रदर्शनाने करून दिली आहे. सर्व प्रकारच्या चित्रकलेसंबंधाने जनतेत अभिरुची उत्पन्न करून, चित्रकारांनाही त्यामुळे शक्य तेवढे उत्तेजन मिळावे या हेतूने श्री. लेले यांनी अशा प्रकारचे हे प्रदर्शन मोठ्या प्रयत्नांनी भरविले असून त्यांना या कामी यश मिळणे प्रेक्षकांच्या सहानुभूतीवर अवलंबून आहे.'

Herald ने प्रदर्शनातील कलाकृतींचे मार्मिक रसग्रहण खालील शब्दांत केले होते :

हेरल्ड ११.११.२७

'Fine Art Exhibition

'AN INSTRUCTIVE AND AMUSING SHOW

'The Fine Art Exhibition which was recently opened at Ram Bag near C.P. Tank is a miniature Wembley of arts and crafts. The organiser, Mr. Lele, is himself a Wembley man and has utilised his experiences in Wembley and Philadelphia in the make-up of the show. There are paintings of every variety and water colour drawings which attract the eye. Many of them have been awarded medals in previous exhibitions.

'Draupadi Swayamvar by Mr. Nagarkar, Glory of Pandharpur by Mr. Dhurandhar, and the Peshwa's Durbar by Mr. Parandekar are some of the artistic masterpieces in the show. The Exhibition includes the famous wax figures of Mr. Phadke, works of art by other eminent painters and sculptors, and also a section for the show of artistic skill of feminine accomplishments – needlework and embroidery.

'Mr. Phadke whose model of Mahatmaji's operation has secured world-wide fame, has portrayed Mumtaz Begum in wax. Electric contrivances are applied and the spectator is able to see veiled Mumtaz Begum as she is, and the old Kamalabai, at one and the same time. The featuring of this model is particularly striking. The wax-model of Scape-bull and Politics is a wax-model satire on Indian parties and politics and is the best cure for the splenetics of politicians. The

Snake Charmer and Daily Task by Talim are very expressive and speak volumes about the skill of the sculptor.

'The Ladies' Section is no less interesting and the threadworks are a tribute to the needle artists. In this section, Monarch of Glen by Mrs Talim, Velvet Swans by Miss Manker, The River Side by Miss Dimtimkar and Swan by Miss Mhatre are some of the finest productions. There is also a section in photography and black and white models. Both for amusement and instruction, the exhibition is worth visiting.'

वरील दोन वर्णनांवरून अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो, त्या अशा : मुंबईत वेगवेगळ्या कला-क्षेत्रांत कार्यरत असणारे स्त्री-पुरुष कोण व त्यांच्या नामांकित कलाकृती कोणत्या यांची चांगली माहिती माझ्या वडिलांना होती. ज्याअर्थी त्यांनी ह्या अनेक कलाकारांच्या कलाकृती प्रदर्शनात मांडण्यासाठी मिळविण्यात यश संपादन केले होते, त्याअर्थी त्यांची त्या-त्या कलाकारांशी ओळख असावी, सौहार्दाचे संबंध असावेत व त्यांच्या शब्दाला त्या-त्या कलाकारांच्या लेखी किंमत असावी (ते कलाकार माझ्या वडिलांना 'एक विश्वसनीय समानधर्मा' मानत असावेत). दुसरी गोष्ट अशी की, माझ्या वडिलांच्या ठिकाणी चिकाटी होती. त्यांनी सुमारे ५० कलाकारांच्या जवळपास २५० कलाकृती प्रदर्शनासाठी एकत्रित केल्या होत्या. ह्या कामासाठी त्यांना कलाकारांना अर्जविनंत्या कराव्या लागल्या असतील, त्यांच्याकडे हेलपाटे मारावे लागले असतील तसेच त्यांना काही भले-बुरे अनुभवही आले असतील. पण ते सारे त्यांनी सहन करून शेवटी आपले उद्दिष्ट साध्य केले. ह्यावरून त्यांच्या अंगी अंगीकृत कार्यावरील निष्ठा व ते कार्य तडीस नेण्याची जिद्द हे दोन्ही गुण जबरदस्त होते, असे दिसते. तिसरी गोष्ट म्हणजे एवढ्या कलाकृती आपण प्रदर्शनाच्या कालावधीत खराब न होऊ देता व्यवस्थितपणे जपून ठेवू शकू आणि प्रदर्शनाच्या समाप्तीनंतर त्या ज्याच्या त्याला नीटपणे परत करू शकू असा त्यांना जबरदस्त आत्मविश्वास असला पाहिजे. एवढ्या कलावस्तू एकत्र करण्याच्या धडाडीला हा आत्मविश्वास पूरक ठरला असला पाहिजे. अशा प्रकारचे बहुविध कलाकृतींचे प्रदर्शन प्रेक्षकांना आवडेल अशी खात्री त्यांना फिलाडेल्फियाच्या प्रदर्शनातील अनुभवावरून वाटत असली पाहिजे. एकंदरीने रामबागेतील ह्या संमिश्र कलाप्रदर्शनामुळे त्यांच्या अंगचे अनेक गुण कसाला लागले.

## विविधकला प्रदर्शनाची प्रशस्ती

माझ्या वडिलांच्या स्पृहणीय उपक्रमाचे अतिशय यथार्थ आकलन व मूल्यांकन प्रभुप्रभात नावाच्या एका ज्ञातीय नियतकालिकाने आपल्या एका अंकात (अंकाची तारीख, महिना व वर्ष अनुपलब्ध) खालील शब्दांत केले होते, ते मुद्दाम उद्धृत करतो :

### ''श्री. लेले यांचे चित्रकला प्रदर्शन

(आमच्या बातमीदाराकडून.)

''कावसजी पटेल तलावाजवळील रामबागेच्या जागेत यंदा चित्रकला प्रदर्शन भरले असून प्रवेश-द्वारातून आत प्रवेश केल्याबरोबर गेल्या साली आपल्या ज्ञातीच्या भरलेल्या प्रदर्शनाची चटकन आठवण होते. श्री. फडके यांनी मेणाची हालती चित्रे करण्याच्या कलेत प्रावीण्य मिळविले आहे ही गोष्ट आज नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. सदहू प्रदर्शनाला (देण्यात आलेले) औद्योगिक व शैक्षणिक वळण पाहून कोणालाही आनंदच वाटेल. प्रदर्शनात जे काही नावीन्य आहे ते मुंबईतील कुशल चित्रकारांच्या चित्रकलेचा संग्रह हेच होय. ऑईल पेन्टिंगची, वॉटर कलरची मनोवेधक व चित्ताकर्षक चित्रे, सृष्टीतील रमणीय देखावे व दृश्ये पाहून मनाला खरोखरीच आल्हाद वाटतो. श्री. ओक यांचे 'कुमुदिनी', श्री. परांडेकर यांचे 'नित्यप्रार्थना', श्री. लाड यांचे 'मार्ग-प्रतीक्षा', 'मराठा युवति', व 'आशाबद्ध,' श्री. चुडेकर यांचे 'एकतारीवर गाणारा भिकारी', त्याचप्रमाणे डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, लो. टिळक वगैरे चित्रे फारच वाखाणण्यासारखी आहेत. आपल्या ज्ञातीतील श्री. माधवराव वि. धुरंधर व श्री. सुंदर नारायण गोरक्षकर यांचीही आपल्या ज्ञातीच्या प्रदर्शनांतून ठेवलेली चित्रे येथे दिसतात. श्रीयुत फडके यांची मेणाची हालती चित्रे म्हणजे महात्मा गांधींचे ऑपरेशन, गोषांतील व हिंदी पेहरावातील मुमताज बेगम, श्री. लक्ष्मीनारायण, म. गांधी व चरक्यावर सूत काढणे ही होत. या चित्रांपैकी श्री लक्ष्मीनारायणाची मूर्ती पाहताना चित्त तल्लीन होते व जागेवरून हालू नये असे वाटते. त्याचप्रमाणे तालीमकृत ब्रॉंझ धातूचा गारुडी (Snake-Charmer) व प्लास्टरमय विधवेचा 'नित्यव्यवसाय' हे पुतळेही पाहण्यालायक आहेत. या प्रदर्शनातील आणखी एक विशेष हा आहे की, स्त्रियांच्या कलाकौशल्याचे नमुने म्हणजे रेशमाची, झिकाची, मखमलीवरील पेंटिंग, फ्रेटवर्क इत्यादी कामेदेखील या प्रदर्शनातून लहानशा प्रमाणावर मांडण्यात आली आहेत. प्राचीन चित्रकलेचे काही नमुनेही येथे ठेवलेले आहेत. सारांश, सदहू प्रदर्शन चित्ताकर्षक व शैक्षणिक करण्याचा प्रयत्न केलेला असून तो आमच्या मते थोड्याबहुत अंशी सफल

झाला आहे. लहानशा प्रमाणावर अशा तऱ्हेची औद्योगिक व चित्रकला प्रदर्शने वारंवार भरवीत गेल्यास राष्ट्राची सुधारणा सर्व बाजूंनी होण्यास विलंब लागणार नाही. सदहू प्रदर्शनामुळे स्त्रियांच्या कलेचे महत्त्वदेखील सर्वांच्या अनुभवास येणारे असून प्रस्तुत प्रदर्शन यशस्वी करण्याचे सर्व श्रेय त्याचे उद्योगप्रिय व उत्साही तरुण चालक श्री. के. बी. लेले यांच्याकडेच आहे. सदहू प्रदर्शनाला आपल्या ज्ञातींतील स्त्रीपुरुषांनी अवश्य एकदा तरी भेट द्यावी अशी आम्ही शिफारस करितो.''

मुंबईच्या हेरल्डने आपल्या २३-११-१९२७ च्या अंकात

'The fine art exhibition organized by Mr. Lele at Rambagh, C. P. Tank, will be closed on Sunday, after a successful run for two months'

अशी बातमी छापली होती. २३ नोव्हेंबरला बुधवार होता,[२३] त्यावरून त्याच्या पुढच्या रविवारी २७ तारीख होती असे ठरते. त्या दिवशी रामबाग येथील ते अपूर्व प्रदर्शन समाप्त झाले.

## फडक्यांची नोकरी सोडली

रामबाग येथील प्रदर्शनाच्या समाप्तीनंतर माझ्या वडिलांच्या व्यावसायिक जीवनात एक बदल घडून आला. ते १९१८ सालच्या सुमारास फडके यांच्या सेवेत दाखल झाले होते, ह्याबाबतचा उल्लेख वर एके ठिकाणी केलाच आहे. फडके यांनी १९१७ सालापासून रामबागेत 'फडके चित्रकला प्रदर्शन' भरविण्यास सुरुवात केली होती, असे The Indian Daily Mail च्या ११ नोव्हेंबर १९२६ च्या अंकातील 'The tenth Annual Exhibition of Prof Phadke's Fine Art Works was opened at Rambag near C. P. Tank last week.' ह्या विधानाच्या आधारे म्हणता येते. अर्थात सन १९१७ पासून १९२७ पर्यंतच्या अकरा-बारा वर्षांच्या काळात फडके यांना चित्रकला प्रदर्शनाच्या व्यवसायापासून चांगलीच आर्थिक प्राप्ती झाली होती. मुंबईतील त्यांच्या वार्षिक प्रदर्शनांना खूप गर्दी होत असे. वेम्ब्ले, फिलाडेल्फिया व १९२७ मधील रामबाग ही तीन प्रदर्शने फडके यांना आर्थिक दृष्ट्या अतिशय लाभदायक ठरली होती. विशेषत: परदेशांतील वरील दोन प्रदर्शनांत भरपूर द्रव्यलाभ झाला होता. असे असतानाही फडके व माझे वडील ह्या दोघा गुरु-शिष्यांत काही व्यवसायेतर कारणांमुळे मतभेद झाले. ते मिटण्याची शक्यता नाही असे जाणवताच माझ्या वडिलांनी फडक्यांच्या सेवेतून मुक्त होण्याचा निर्णय घेतला आणि आपला स्वत:चा स्टुडिओ स्थापण्याचे ठरविले.

## स्वतंत्र व्यवसायाला धडाडीने सुरुवात

जरी माझ्या वडिलांनी स्वतंत्र स्टुडिओ स्थापन करण्याचा निर्णय घेतला तरी तो अमलात आणण्यासाठी त्यांच्याजवळ भांडवल नव्हते. ती गरज त्यांचे एक हितचिंतक व दूरचे नातलग कै. हरी पांडुरंग लेले यांनी भागवली. त्यांनी माझ्या वडिलांना दहा हजार रुपये अल्प व्याजाच्या अटीवर कर्जाऊ दिले. अशा प्रकारे भांडवलाची तरतूद झाली. ती रक्कम घेऊन माझे वडील झपाट्याने कामाला लागले. त्यांनी स्वतंत्र स्टुडिओ तर उभारलाच पण चार-पाच महिने अहोरात्र परिश्रम करून नवीन पुतळे बनवले आणि ते घेऊन कराचीला प्रयाण केले. तेथे चित्रांची मांडामांड केली आणि कराची शहरातील बंदर रोडवर स्टार सिनेमाशेजारी २२ मार्च १९२८ रोजी Lele's Fine Art Works ह्या नावाने प्रदर्शनास सुरुवात केली. येथे एका गोष्टीचा खुलासा करणे आवश्यक वाटते. जरी ह्या (किंवा फडके यांच्या सुद्धा) प्रदर्शनात पुतळे किंवा शिल्पे मांडण्यात येत असत तरी प्रदर्शनाची जाहिरात मात्र चित्रकला प्रदर्शन अशीच करण्याची प्रथा पडून गेली होती. त्यामुळे प्रदर्शनाच्या मंडपावर लेले यांचे चित्रकला प्रदर्शन असाच फलक लावण्यात येत असे.

कराचीस प्रदर्शन सुरू झाल्याचे वृत्त The Sind Observer ह्या दैनिकाने २४.३.२८ च्या अंकात छापले होते. त्यात पुतळ्यांचे यथातथ्य वर्णन केलेले असल्यामुळे ते खाली जसेच्या तसे उद्धृत करीत आहे.

"GLIMPSES OF GANDHIJI.

"WONDERFUL WAX MODELS.

"FINE EXHIBITION IN KARACHI

"An exhibition of wax models of high quality has been opened here in a structure erected on an open space on Bunder Road near The Star Cinema. The exhibition has been attracting a large number of people who are wonder-struck at the realistic representation of Mahatma Gandhi in different postures. In one model he is shown spinning on the wheel with concentrated attention. In another, Mahatmaji is shown revising the copy of his "Experiments with the Truth" and his movement of the head is quite natural. Seated in a corner of the room a lady is seen turning the spinning-wheel. She is supposed to be a symbolic representation of the All-India Spinners' Association. In the background through a window

is seen a blaze of coloured light which represents the burning of foreign cloth. In a third model Mahatmaji is seen lying on the operation table in the civil hospital at Poona, and also the Surgeon and nurses. One nurse is seen moving towards the table from some distance with some necessaries in her hand. The device by which Mahatmaji breathes and his stomach heaves is really ingenious.

"Another attraction which is a triumph of the plastic art, represents Sri Lakshmi and Narayan with fine features, before whom a Pujari is chanting verses from a book. Seated beneath the pedestal is a Bairagi whose fidelity to life in every detail is quite surprising. There is a model of Mumtaz also whose veiled figure is reflected in an adjacent mirror. Beside that her figure clad in red sari as she was when living with the Maharaja of Indore, is reflected in a side mirror and the trick of its appearance there quite baffles the uninitiated.

"The exhibition is well worth a visit and deserves widespread patronage at the hands of all lovers of art."

'कराची हीतेच्छु' या गुजराती वृत्तपत्रानेही प्रदर्शनाची थोडक्यात पण वरीलप्रमाणेच प्रशंसा केली होती. त्या वृत्तपत्राने आपल्या २७.३.२८ च्या अंकात प्रदर्शन दर बुधवारी व शुक्रवारी दुपारी दोन ते पाच पर्यंत खास स्त्रियांसाठी उघडे राहील अशी सूचनाही, खालील शब्दांत, अगत्याने दिली होती :

"स्त्रीओने माटे खास सगवड

"बंदर रोड पर खालखकदीना होलमां भरायेल मीणनी कारीगरीना हुबहु पुतळांओनुं प्रदर्शन नीरखवा ते प्रदर्शनना व्यवस्थापकोए स्त्रीओ माटे खास गोठवण करी बुध अने शुक्रवारना दहाडा पर २ थी पांच वाग्या सुधी प्रदर्शन स्त्रीओ माटे खास राखवानी व्यवस्था करी छे."

वरील वृत्तांवरून दोन गोष्टी जाणवतात, त्या अशा : माझ्या वडिलांनी फडक्यांची नोकरी सोडल्यानंतर फडके यांच्या प्रदर्शनात नसलेली काही चित्रे स्वतंत्रपणे बनवून आपले कला-प्रदर्शन अत्यल्प अवधीत उभे केले होते. एकीकडे त्यांना चरितार्थाचा प्रश्न सोडवावयाचा होता आणि दुसरीकडे कर्जाची सव्याज परतफेड करावयाची होती. त्यामुळे त्यांना तसे करणे प्राप्त होते. ह्याबाबतीत जाणवणारी

दुसरी गोष्ट म्हणजे प्रदर्शन पाहू इच्छिणाऱ्या स्त्री-प्रेक्षकांच्या सोयीचा त्यांनी अगत्याने विचार केला होता.

१९२८ सालीच त्यांच्या व्यावसायिक जीवनात फ्रान्सचा दौरा ही घटना घडली की नाही, ते निश्चितपणे ठरविता येत नाही. मुंबईच्या क्रॉनिकल् दैनिकाने २७.५.२८ च्या अंकात त्यांचे कृष्णधवल छायाचित्र छापून त्याच्या खाली पुढीलप्रमाणे सूचनावजा वृत्त दिले होते :

> 'Mr. K. B. Lele, organiser of the Fine Arts Exhibition, Bombay, who will soon leave for Paris to take part to (or in?) the International Exhibition to be held there.'

नागपूरच्या 'महाराष्ट्र' नेही २५.११.२८ च्या अंकात 'श्री. लेले हे आपला चित्रसमूह पारीस येथे १९२९ साली भरणाऱ्या सर्व जगाच्या कलाकुसरीच्या प्रदर्शनात नेऊन मांडणार आहेत. तेथेसुद्धा त्यांची वाहवाच होईल अशी उमेद आम्हाला वाटते', अशी बातमी छापली होती.

परंतु माझ्या वडिलांच्या संग्रहातील कागदपत्रांत वरील बातमीची पुष्टी करणारी कात्रणे किंवा छायाचित्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ते फ्रान्सला गेले होते की नव्हते, गेले असलेच तर १९२८ साली की १९२९ साली, इत्यादी बाबींविषयी काहीही निश्चितपणे सांगता येत नाही.

## नागपूर येथील प्रदर्शनात सन्मान

१९२८ सालच्या अखेरीस त्यांनी आपले प्रदर्शन नागपूरला आणि १९२९ सालच्या सुरवातीस मद्रासला मांडले होते, असे मात्र निश्चितपणे म्हणता येते. नागपूरच्या 'महाराष्ट्र' ने आपल्या २५.११.२८ च्या अंकात त्यांच्या प्रदर्शनाची बातमी पुढील शब्दांत दिली होती :

> ''**मेणाची हालती चित्रे.**
>
> ''श्री. लेले यांचे प्रदर्शन.
>
> ''मुंबईचे श्री. लेले हे आपल्या मेणाच्या हालत्या चित्रांचे प्रदर्शन घेऊन काँग्रेसच्या हंगामासाठी कलकत्त्यास जात आहेत. त्यांनी वाटेत नागपुरास उतरून येथील चिटणीस पार्कमध्ये आपले प्रदर्शन मांडले आहे. ते या महिनाअखेरपर्यंत खुले राहील. त्यांची मेणाची चित्रे इतकी हुबेहूब व डौलदार साधली आहेत की ती पाहून खरोखरची माणसेच तेथे बसली आहेत की काय असा भास प्रेक्षकांस होतो! 'मुंबईचा पाटीवाला हमाल', 'कचेरीतील पट्टेवाला शिपाई',

'फळफळावळ विकणारा घाटी दुकानदार', 'पंचांग पाहणारा ज्योतिषी', 'मणी विकणारा मुसलमान फेरीवाला', 'कृष्णजन्माचे वेळी बाहेर डुलक्या देत बसलेले पाहरेकरी' इ. चित्रे ही नितांत मनोवेधक आहेत. तसेच विश्वामित्र-मेनका, यशोदा-कृष्ण वगैरे चित्रेही सुंदर आहेत. स्वल्प किंमतीत (२ आणे व लहान मुलास १ आणा देऊन) ही चित्रे पाहण्याजोगी आहेत. ती पाहिली असता हिंदी कलाकौशल्याची काही कल्पना होते....''

इतर वृत्तपत्रांनीही लेले यांच्या प्रदर्शनाची अशीच वाखाणणी केली होती.

'हजारो प्रेक्षकांचा समाज प्रदर्शन पाहण्यास लोटत असे',

असे वृत्त मुंबईच्या 'नवा काळ' ने (१६.१.२९) दिले होते. माझ्या वडिलांच्या कलेला केवळ प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत होता असे नव्हे, तर नागपूरचे राजेबहादूर श्रीमंत रघुजीराव भोसले यांनी माझ्या वडिलांना सुवर्णपदक देऊन त्यांचा गौरव केला होता. ही त्यांच्या कलाकौशल्याला मिळालेली पावतीच होती. माझ्या वडिलांच्या कला-कारकिर्दीच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली ही बातमी 'महाराष्ट्र' (१९.१२.२८) व 'नवा काळ' (१६.१.२९) ह्या मराठी नियतकालिकांनी आणि 'डेली मेल' (११.१.२९) व 'द टाइम्स ऑफ इण्डिया' (१२.१.२९) ह्या इंग्रजी दैनिकांनीही आठवणीने दिली होती.

## मद्रासला दोन सुवर्णपदकांचे मानकरी

माझे वडील नागपूरचा मुक्काम आटोपून मद्रासला (आताच्या चेन्नईला) गेले आणि तेथे प्रथमत: त्यांनी Baby Week मध्ये आपले प्रदर्शन मांडले. हे प्रदर्शन एक आठवड्याचेच असून The International (fifth) Exhibition 1927-28 असे त्याचे नामकरण करण्यात आले होते. माझ्या वडिलांच्या प्रदर्शनाला ह्या ठिकाणीही उत्तम प्रतिसाद मिळाला आणि त्यांना सुवर्णपदक बहाल करण्यात आले. हे प्रदर्शन १.१२ ते ७.१२.२८ पर्यंत चालू होते. माझ्या वडिलांनी Baby Week च्या संयोजकांना १६० रुपयांची देणगी दिली.

लगेच १५.१२.२८ पासून चेन्नईमध्ये Park Fair Exhibition सुरू झाले व ते जानेवारी १९२९ च्या चवथ्या आठवड्यापर्यंत म्हणजे सुमारे महिनाभर चालू होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रेक्षकांची खूप गर्दी होत असे. ह्या प्रदर्शनाचीही बातमी 'नवा काळ' (१६.१.२९) व 'केसरी' (२९.१.२९) ह्या मराठी वृत्तपत्रांबरोबरच 'Daily Mail' (११.१.२९) व 'The Times of India' (१२.१.२९) ह्या इंग्रजी वृत्तपत्रांनीही छापली होती.

मद्रासचे तत्कालीन गव्हर्नर मि. गोश्चेन व त्यांच्या पत्नी लेडी गोश्चेन (Lady Goschen) ह्यांनी प्रदर्शनास भेट देऊन शिल्पकृती पाहिल्या. त्यांना त्या इतक्या आवडल्या की, लेडी गोश्चेन ह्यांनी माझ्या वडिलांना सुवर्णपदक देऊन त्यांचा बहुमान केला (केसरी, पुणे २९.१.२९).

माझे वडील १९२९ सालच्या फेब्रुवारी महिन्यात चेन्नईहून मुंबईला परत गेले. तेथे त्यांनी थोडी विश्रांती घेतली, काही नवीन शिल्पकृती बनवल्या व ते पुन्हा दक्षिण भारताच्या दौऱ्यावर निघाले.

## दक्षिण भारताचा दुसरा दौरा

प्रथमत: ते तंजावरला गेले व तेथे त्यांनी जून १९२९ मध्ये चित्रकला प्रदर्शन मांडले. ते फार लोकप्रिय झाले असल्याची बातमी केसरीने (२५.६.२९) आवर्जून छापली होती. प्रदर्शनातील उत्कृष्ट चित्रांचा लौकिक हस्ते-परहस्ते कुंभकोणममधील कलारसिकांच्या कानांवर गेला. तेव्हा त्यांनी प्रदर्शन कुंभकोणमला बोलावून घेतले. [२४] तदनुसार कुंभकोणमला माझ्या वडिलांचा मुक्काम सुमारे महिनाभर होता. तेथील कलानुरागी प्रेक्षकांनी प्रदर्शनाची खूप प्रशंसा केली. तंजावर व कुंभकोणम ह्या दोन्ही ठिकाणी माझ्या वडिलांना उत्कृष्ट प्रदर्शनाबद्दल प्रशस्तिपत्रे मिळाली. कलाप्रेमी प्रेक्षक एखाद्या शिल्पकाराला आपल्या गावी बोलावून घेतात असा दुर्मिळ योग क्वचितच एखाद्या शिल्पकाराच्या जीवनात येत असेल. ते भाग्य माझ्या वडिलांना लाभले होते.

## पुन्हा एकदा नागपूर-दौरा

माझे वडील आपले प्रदर्शन घेऊन पुन्हा एकदा ऑक्टोबर २९ मध्ये नागपूरला गेले. तेथील Baby Week मध्ये नोव्हेंबर-डिसेंबर २९ मध्ये लेले चित्रकला प्रदर्शन मांडले गेले. त्याबद्दलचे वृत्त बॉंबे क्रॉनिकल् (११.१२.२९) व महाराष्ट्र, नागपूर (१२.११.२९) मध्ये छापून आले होते. 'महाराष्ट्र' ने वृत्त पुढीलप्रमाणे दिले होते :

"श्री. के. बी. लेले यांचे चित्रकला प्रदर्शन.

"चित्रकार श्री. लेले यांनी आपले चित्रकला-प्रदर्शन नागपूर येथे बेबी वुइक प्रदर्शनमध्ये मांडले होते. लालाजींचे स्वर्गारोहण, लो. टिळक वगैरे चित्रे प्रेक्षकांना फारच आवडली व ती पाहण्याकरिता रोज हजारो प्रेक्षकांचा समाज जमत असे. ता. ३ डिसेंबर रोजी मध्यप्रांताचे नवे गव्हर्नर ना. तांबे, राजे रघोजीराव भोंसले, रा. ब. लक्ष्मीनारायण वगैरे मंडळींनी प्रदर्शनाला भेट दिली, असे व्यवस्थापक कळवितात."

## मुंबईचे स्वदेशी प्रदर्शन

मुंबईला माधवबागेत जुलै १९३० ते सप्टेंबर १९३० असे दोन महिने स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात माझ्या वडिलांनी आपले चित्रकला प्रदर्शनही मांडले होते. त्यासंबंधी दादर (मुंबई) येथील 'नवा मनु' नामक नियतकालिकाने १.९.१९३० च्या अंकात एक लेखवजा वृत्त छापून त्यात मेणाच्या चित्रांचा पूर्वेतिहास दिला होता. त्या दृष्टीने तो लेख महत्त्वाचा असल्यामुळे त्यातील काही भाग खाली उद्‌धृत करीत आहे :

"...मुंबईस माधव बागेत गेले दोन महिने स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन उघडण्यात आले असून... याच ठिकाणी सुप्रसिद्ध चित्रकार श्री. केशव बाबुराव लेले यांनी तयार केलेली मेणाची चित्रे ठेवण्यात आली आहेत. श्रीयुत लेले यांनी स्वत:च्या कर्तबगारीने मेणाच्या चित्रकलेत (Wax Works) उत्तम प्रकारचे प्रावीण्य संपादन केले असून, हिंदुस्थानातच नव्हे तर फ्रान्स, इंग्लंड, न्यूयॉर्क (की फिलाडेल्फिया?) इत्यादी परराष्ट्रांतही जाऊन त्यांनी तेथील प्रदर्शनांत हिंदी चित्रकार जगाच्या मागे नाहीत, ही गोष्ट निदर्शनास आणली आहे. त्यांच्या या चित्रकलेबद्दल त्यांचा कोणीही गौरव करील. मुंबईतील वर उल्लेखिलेल्या प्रदर्शनात त्यांनी ठेविलेली १ चरख्यावर सूत काढीत बसलेले म. गांधी, २. महात्मा गांधींचे सत्याग्रहाकरिता दांडीकडे प्रयाण, ३ दारू दुकानावरील पिकेटिंग, ही सद्य:स्थितिनिदर्शक चित्रे व ४ मेनका-विश्वामित्र ५ श्रीराधा-कृष्ण ही सर्व चित्रे चित्ताकर्षक व कलेच्या दृष्टीने निर्दोष अशी आहेत. मेणाच्या चित्रकलेत मराठे, फडके, लेले प्रभृतींनी नैपुण्य व लौकिक संपादून, महाराष्ट्राच्या व पर्यायाने हिंदुस्थानच्या कीर्तीत भर घातली आहे. प्रस्तुत मेणाची चित्रकला इ. स. १९०१ च्या सुमारास सायमन नावाच्या युरोपियन गृहस्थाने आणिली. लंडनमध्ये मॅडम टु शॉट, न्यूयॉर्कमध्ये कोनी आयलंड इत्यादी ठिकाणी मेणकामाचे फार मोठ्या प्रमाणात देखावे असून त्या कामी चित्रकारांस तेथील सरकारकडून आर्थिक दृष्टीने चांगले साहाय्य होत असते व लोकांकडूनही अशा प्रकारच्या प्रदर्शनास उत्तेजन दिले जाते. ...आमचे इकडील चित्रकारांस अशा प्रकारचे उत्तेजन देण्याचे सरकारने ठरविल्यास त्यायोगे येथील हिंदी कलेचा उत्कर्ष होणार नाही काय?.... प्रस्तुत सुंदर कलेची जोपासना जर शिक्षण खात्यामार्फत झाली तर अनेक बुद्धिमान विद्यार्थी त्याचा फायदा घेतील व अल्प काळातच तिचे संवर्धन होईल. तरी सरकारने व इतर शिक्षणसंस्थांनी इकडे अवश्य लक्ष द्यावे, अशी आमची आग्रहाची विनंती आहे."

## स्वतंत्र व्यवसायातील यशस्वी सलामी

पूर्वी नमूद केल्याप्रमाणे माझ्या वडिलांनी १९२८ साली स्वतंत्र स्टुडिओ स्थापून लेले चित्रकला प्रदर्शनास सुरुवात केली. तेव्हापासून १९३० सालापर्यंत अहोरात्र अविश्रांत परिश्रम करून त्यांनी आपल्या व्यवसायात उत्तम जम बसवला. ह्या तीन वर्षांच्या काळात एकूण आठ प्रदर्शने भरविली, चार सुवर्णपदके पटकावली आणि तत्कालीन मुंबई व मद्रास इलाख्यांतील प्रमुख शहरांत एक उत्कृष्ट शिल्पकार म्हणून लौकिक संपादन केला. शिवाय, हजारो कलाप्रेमींना उत्कट व निर्भेळ आनंद दिला. त्यांच्या प्रदर्शनातील 'महात्मा गांधींचे सत्याग्रहाकरिता दांडीकडे प्रयाण' ह्या देखाव्याचे छायाचित्र खाली छापले आहे.



मुंबई समाचार (गुजराती)
सप्टेंबर १९३० :
म. गांधींचे दांडीकडे प्रयाण

## वैभवाचा कालखंड : १९३१ ते १९३९

१९३१ साल माझ्या वडिलांच्या जीवनात अनेक कारणांखातर महत्त्वाचे ठरले. पहिले कारण म्हणजे अहमदनगरला भरलेल्या स्वदेशी प्रदर्शनात त्यांना सुवर्णपदक मिळाले. नगरचे प्रदर्शन २० जानेवारी १९३१ रोजी सुरू झाले व ते ३ फेब्रुवारी १९३१ रोजी समाप्त झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन देशभक्त गंगाधरराव देशपांडे यांच्या हस्ते झाले आणि त्याचा समारोप श्री. भाऊसाहेब फिरोदिया ('देशबंधु'चे संपादक) यांच्या हस्ते झाला. समारोप-प्रसंगी सत्याग्रहाच्या चळवळीचे

उत्साही कार्यकर्ते श्री. दादासाहेब चौधरी यांच्या हस्ते अनेक उद्योजकांना प्रशंसापत्रे, रौप्यपदके व सुवर्णपदके देण्यात आली. माझ्या वडिलांना त्यांच्या मेणाच्या चित्रांच्या प्रदर्शनाबद्दल सुवर्णपदक बहाल करण्यात आले. [२५]

त्या सालातील दुसरी अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे म. गांधींनी लेले चित्रकला-प्रदर्शनाला दिलेली भेट, ही होय. मार्च १९३१ मध्ये 'खादी प्रदर्शन कचेरी'च्या वतीने कराचीला स्वदेशी प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याच्या व्यवस्थापकांची, कार्यकर्त्यांची आणि कर्मचाऱ्यांची अशी उत्कट इच्छा होती की, महात्माजींनी कराचीच्या प्रदर्शनाला एकदा भेट द्यावी व सर्वांशी परिचय करून घ्यावा. परंतु, महात्माजींची ही भेट घडवून आणणे इतके सोपे नव्हते. कारण प्रदर्शन पाहण्यास महात्माजी येणार आहेत असे कळल्यावर त्यांच्या दर्शनासाठी लोकांची झुंबड उडाली असती आणि ती गर्दी आवरणे व्यवस्थापकांना व स्वयंसेवकांना अशक्य होऊन बसले असते, ह्याची जाणीव सर्वत्र संबंधितांना होती. ह्या पेचातून मार्ग काढण्यासाठी श्री. जेरजानी (Sjt. Jerajani) यांनी एक युक्ती लढविली. त्यांनी २५ मार्च १९३१ रोजी रात्री ११ वाजता सर्व कार्यकर्त्यांची एक अनौपचारिक बैठक भरविली. त्या बैठकीत दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता महात्माजींना प्रदर्शन बघण्यास घेऊन यावयाचे, असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे व्यवस्थापकांनी महात्माजींना विनंती केली, ती त्यांनी तत्परतेने मान्य केली आणि महात्माजी २६.३.१९३१ रोजी पहाटे पाच वाजता प्रदर्शनाच्या महाद्वारावर येऊन थडकले. कार्यकर्त्यांची एकच धावपळ उडाली. श्री. जेरजानी व श्री. विठ्ठलभाई पटेल ह्यांच्याबरोबर महात्माजींनी प्रदर्शनातील एकेक दालन बघितले आणि त्यानंतर ते Lele's Fine Art Works समोर येऊन उभे राहिले. त्यानंतर काय घडले ते चन्द्र शंकर बुच यांच्याच चित्रमय शब्दांत समजून घेऊ. बुच लिहितात : 'He also paid a visit to Sjt. Lele's wax work(s) and the wax work of the operation, which he (= Gandhiji) had undergone, struck him and it made him heartily laugh. Bye-the-bye (by the by/bye?), Sjt. Lele made a request to Mahatmaji for his certificate and Sjt. Jerajani humorously asked, as the price, a vow of Khadi-wear." [२६]

महात्माजींना आपल्या प्रदर्शनाच्या द्वारी बघून माझ्या वडिलांना अपार हर्ष झाला असणार ह्यात शंकाच नाही. महात्माजींना स्वत:च्याच ऑपरेशनचा देखावा बघून हसू आले. ते पाहून व ऐकून माझ्या वडिलांना 'आज आपली कला सफल झाली' अशी कृतकृत्यता निश्चितपणे वाटली असेल. त्यांनी खादीचा पोशाख घालण्याचे व्रत घेतले होते की कसे ते सांगता येत नाही. पण ते मधूनमधून खादीचे कपडे अवश्य घालीत असत, असे आमच्या घरी खादीच्या पोशाखातील त्यांचे जे एक छायाचित्र होते त्याच्या आधारे म्हणता येते.

याच वर्षी (१९३१) त्यांचा विवाह झाला, ही त्यांच्या जीवनातील तिसरी

महत्त्वाची घटना होती. त्यांची पत्नी म्हणजे माझी आई कुर्ल्याच्या हरी वासुदेव जोशी (चितळे) यांची मधली मुलगी, अंबू. तिचे सासरचे नाव लक्ष्मी. तिला एक मोठी व एक धाकटी अशा दोन बहिणी आणि दोन मोठे व दोन धाकटे असे चार बंधू मिळून सहा भांवडे होती. माझ्या आईचे शिक्षण मराठी दोन इयत्तांपर्यंत झालेले होते.

१९३२ साली त्रिचनापल्ली (आताचे तिरुचिरापल्ली) येथे अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्या प्रसंगी जे All India Swadeshi Exhibition मांडण्यात आले होते त्यात लेले चित्रकला प्रदर्शनही होते. त्यातील शिल्पकलेचा आनंद प्रेक्षकांनी प्रचंड संख्येने उपस्थित राहून तर लुटलाच, पण स्वदेशी प्रदर्शनाच्या संयोजकांनीही भाझ्या वडिलांना सुवर्णपदक देऊन त्यांचा बहुमान केला.

माझ्या वडिलांनी १९३३ साली तर प्रदर्शनांची हॅट्ट्रिक साधली होती. त्या वर्षी एप्रिल महिन्यात कलकत्ता येथे पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. शिवाय, कुंभकोणमला महामखम् अखिल भारतीय स्वदेशी प्रदर्शनाचे (Mahamakham All India Swadeshi Exhibition) आयोजन करण्यात आले होते. तसेच मदुराई येथेही ऑल इण्डिया स्वदेशी प्रदर्शन भरविण्यात आले होते. माझ्या वडिलांनी आपले चित्रकला प्रदर्शन ह्या तिन्ही ठिकाणी मांडले होते व त्यास प्रेक्षकांकडून सर्वत्र उत्तम प्रतिसाद मिळाला होता. कुंभकोणम व मदुराई या दोन्ही ठिकाणी माझ्या वडिलांना सुवर्णपदक मिळाले होते.

त्यांना १९३३ सालीच २९ मे रोजी पुत्रलाभ झाला. ही त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील उल्लेखनीय घटना होती. मुलाचे कागदोपत्री नाव वामन असे लागलेले असले तरी बरेचसे नातेवाईक त्याला राजा ह्या नावाने संबोधीत असत. वाभन केशव लेले म्हणजे प्रस्तुत चरित्रलेखक. ह्याची माहिती पुढे यथास्थल देण्यात येईलच.

१९३४ साली मुंबईला अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते. तेथे माझ्या वडिलांनी आपले चित्रकला प्रदर्शन मांडले होते. त्याच वर्षी वडिलांनी जळगाव मुक्कामी स्वतंत्रपणे आणि अमृतसरला अखिल भारतीय प्रदर्शनान्तर्गत आपली चित्रे प्रदर्शित केली होती. अमृतसरला त्यांना सुवर्णपदक बहाल करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात आला होता.

१९३६ साली लखनौला आणि १९३७ साली जळगाव जिल्ह्यातील फैजपूरला भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनांमध्ये लेले चित्रकला प्रदर्शनाने प्रेक्षकांकडून वाहवा मिळविली होती.

१९३७ साली माझ्या धाकट्या भावाचा जन्म दि. २० जुलै रोजी झाला. त्याचे पाळण्यातील व कागदोपत्री दाखल झालेले नाव यशवंत असून व्यावहारिक नाव

बाळू आहे. ह्याची माहितीही पुढे योग्य जागी दिली जाईल.

अहमदाबादच्या लाल दरवाजा भागात १९३७ सालच्या ऑक्टोबर महिन्यात Swadeshi Art and Industrial Exhibition भरविण्यात आले होते. त्यामध्ये माझ्या वडिलांनी चित्रकला प्रदर्शन मांडले होते. ते पाहण्यास अहमदाबादच्या सरकारी मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पोंल गेले होते. त्यांनी माझ्या वडिलांचे अभिनंदन करून आपला अभिप्राय पुढील शब्दांत व्यक्त केला होता : "लेलेना हालता चालता पुतळानुं प्रदर्शन जोई मने घणोज आनंद थयो. आ उत्तम कारीगरीने प्रेक्षकवर्ग जरुर वधावी लेशे. मि. लेलेने आ कारीगरी माटे अमे हार्दीक अभीनंदन आपीअे छीअे." तरंगीणी नीलकंठ व ईंदीरा मान्देकर या दोन भगिनींनीही 'लेलेना मीणना पुतळानुं प्रदर्शन खास जोवा जेवुं छे', ह्या शब्दांत लेले चित्रकला प्रदर्शनाची तारीफ करून भगिनीवर्गाला हे प्रदर्शन पाहण्याची शिफारस केली होती. तसेच अहमदाबादच्या म्युनिसिपल् स्कूल बोर्डाचे प्रशासकीय अधिकारी श्री. डी. बी. पटेल यांनीही २३.१०.३७ रोजी प्रदर्शनाला भेट देऊन आपला आनंद व्यक्त केला होता.[२७]

माझ्या वडिलांनी १९३८ साली हरिपुरा येथे आणि १९३९ साली त्रिपुरी येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनातही आपले चित्रकला प्रदर्शन मांडले होते.

१९३१ ते १९३९ पर्यंत वरील ठिकाणांखेरीज अकोला, अमरावती, अलाहाबाद, आग्रा, इंदौर, कानपूर, कोईमतूर, ग्वाल्हेर, त्रिवेंद्रम, राजकोट, सुरत इत्यादी ठिकाणीही लेले चित्रकला प्रदर्शनाने कलारसिकांना शिल्पकलेचा आनंद मनसोक्तपणे लुटू दिला होता. १९३९ सालापासून माझ्या वडिलांनी मुंबईबाहेरचे दौरे थांबवले होते.

## अखेरचे पर्व

ह्यापूर्वी म्हटल्याप्रमाणे माझे वडील उपजीविकेसाठी म्हणून १९१८ साली मुंबईला गेले. तेव्हापासून १९३९-४० सालापर्यंत त्यांनी चरितार्थ, कर्जफेड व व्यावसायिक उन्नती ह्या तीन कारणांसाठी अविश्रांत श्रम घेतले. परिणामी, १९४० च्या आसपास त्यांची कार्यक्षमता काही अंशी कमी झाली. त्यामुळे त्यांनी मुंबईतल्या मुंबईतच जास्तीत जास्त प्रदर्शने भरविण्याचा निर्णय घेतला. तदनुसार ते दरवर्षी नायगाव (दादर), कुर्ला (चंपाषष्ठीची जत्रा), माहीम (उरुस), प्रभादेवी (देवीची वार्षिक जत्रा) व वांद्रा (माउण्ट मेरीची यात्रा) एवढ्याच ठिकाणी आपले चित्रकला-प्रदर्शन भरवू लागले. त्यांना प्रदर्शनांतून चांगली प्राप्ती होत असली तरी स्वत:चा प्रपंच व पदरी नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार ह्यावर बराच खर्च होत असे. त्यामुळे म्हणण्यासारखी शिल्लक पडत नसे. त्यातच १९४२

साली मोठ्या मुलाची मुंज व मुटाट येथील वडिलोपार्जित घराची पुनर्बांधणी ह्या दोन बाबींवर त्यांचा बराच पैसा खर्च झाला. त्यामुळे त्यांनी नाइलाजास्तव १९४३ साली मुंबईबाहेर सांगलीला गणपती-मंदिराजवळील मोकळ्या जागेत चित्रकला प्रदर्शन मांडले आणि बऱ्यांपैकी प्राप्तीही केली. पण ती वाढत्या खर्चास पुरे पडणारी नव्हती. त्याच सुमारास त्यांची प्रकृतीही वारंवार बिघडू लागली. त्यांच्या एकूण क्रियाकलापांवर प्रतिकूल परिणाम होऊ लागला. अशा स्थितीत त्यांनी प्रभादेवीच्या जत्रेत मांडलेले प्रदर्शन त्यांच्या कलाजीवनातील अखेरचे कार्य ठरले.

## अकाली निधन

डिसेंबर १९४४ च्या तिसऱ्या आठवड्यात प्रभादेवी येथील जत्रेला सुरुवात झाली. माझ्या वडिलांनी आपल्या गडीनोकरांकरवी प्रदर्शनासाठी नेहमीप्रमाणे मांडव घालून घेतला. सुतार व इतर नोकरवर्ग ह्यांनी प्रदर्शनाच्या मांडणीसाठी आवश्यक ती पूर्वतयारीही केली. पण प्रदर्शनातील पुतळे मांडण्याची शक्ती व उत्साह माझ्या वडिलांच्यात राहिला नव्हता. ते दरवर्षी आपल्या राहत्या घरापासून प्रभादेवीच्या जत्रेच्या ठिकाणापर्यंत चालत जात असत. पण त्या वर्षी त्यांच्यात चालत जाण्याची शक्ती उरली नव्हती. त्यामुळे ते टांग्यात बसून जाऊ लागले. प्रदर्शनाच्या जागी थोडा वेळ काम केल्यावरही त्यांना थकवा जाणवू लागला. अशाही स्थितीत त्यांनी प्रदर्शन मांडले; नेहमीप्रमाणे उघडले; प्रभादेवीची जत्रा सुरू झाली. लेले चित्रकला प्रदर्शन बघावयास प्रतिवर्षाप्रमाणे प्रेक्षकांची रीघ लागू लागली. पण माझ्या वडिलांची प्रदर्शनाच्या जागी उपस्थिती हळूहळू कमीकमी होऊ लागली. डिसेंबरच्या २७-२८ तारखेस मुंबईतील प्रसिद्ध डॉ. साठे यांनी येऊन वडिलांची प्रकृती तपासली, औषधांची यादी लिहून दिली आणि पेशंटला सात-आठ दिवसांत बरे वाटू लागेल, असे आश्वासनही दिले. पण तसे व्हावयाचे नव्हते. वडिलांची प्रकृती उत्तरोत्तर खालावत गेली. त्यांच्या सूचनेनुसार पुण्याहून त्यांचे धाकटे बंधू श्री. विनायक बाबुराव लेले मुंबईला येऊन, आमच्या घरी दोन दिवस राहून, पुण्यास परत गेले. वडिलांची थोरली बहीण श्रीमती येसूताई शेवडे ही मुटाटहून दादरला आली आणि आपल्या भावाची शुश्रूषा करण्यासाठी राहिली. ४ जानेवारी १९४५ रोजी माझ्या वडिलांची प्रकृती खूपच बिघडली, त्या दिवशी संध्याकाळी त्यांना रक्ताची उलटी झाली. तेव्हा घरातील सर्वांच्या तोंडचे पाणी पळाले. डॉक्टरांनी येऊन वडिलांना तपासले व माझ्या आईसह आम्हां सर्वांना धीर दिला. पण अनिष्ट तेच घडले आणि शुक्रवार दि. ५ जानेवारी १९४५ रोजी पहाटे पाचच्या सुमारास वडिलांची प्राणज्योत मालवली. एक कर्तबगार शिल्पकार

वयाच्या अवघ्या पंचेचाळिसाव्या वर्षी पंचत्वात विलीन झाला.

वडिलांच्या निधनाची बातमी हां हां म्हणता दादरमध्ये पसरली व गिरगावातही पोचली. त्यांचा चाहतावर्ग गोळा झाला. सुमारे दोनशे शोकाकुल व्यक्तींनी ५ जानेवारीच्या दुपारी शिल्पकार केशव बाबुराव लेले यांना अखेरचा निरोप दिला.

प्रभादेवी येथे मांडलेले प्रदर्शन त्यानंतर बंद करण्यात आले.

## खेळ चालू राहिला पाहिजे

वडिलांच्या निधनानंतरची सहा वर्षे The show must go on ह्या उद्‌गारांची आठवण करून देणारी ठरली. त्यांच्या मृत्यूसमयी मी जेमतेम बारा वर्षांचा होतो व माझा धाकटा भाऊ आठ वर्षांचा होता. आम्ही दोघे अनुक्रमे इंग्रजी दुसरीत व मराठी तिसरीत शिकणारे शाळकरी विद्यार्थी होतो. माझ्या आईचे वय अवघे ३१ वर्षांचे होते. तिला अकाली वैधव्य प्राप्त झाले होते. तिचे शिक्षणही फारसे झालेले नव्हते. माझ्या वडिलांची बरीचशी कारकीर्द १९२८ साली नवीन स्टुडिओ स्थापन करताना काढलेल्या कर्जाच्या सव्याज परतफेडीतच खर्ची पडली होती. त्यामुळे त्यांच्या मृत्युसमयी आमच्यापाशी फक्त सतराशे रुपये एवढीच पुंजी शिल्लक होती. ती मी मोठा होऊन मिळवता होईतोपर्यंत पुरण्यासारखी मुळीच नव्हती. अशा स्थितीत माझ्या आईला उपजीविकेचा मार्ग चोखाळण्यावाचून गत्यंतर नव्हते. तिने मन घट्ट करून प्राप्त परिस्थितीचा विचार केला, नातलगांशी सल्लामसलत केली, सखाराम, जानू व मोहन या तिन्ही नोकरांनी पूर्ववत निष्ठेने सेवा करण्याचे वचन तिला दिले, तिनेही धैर्य एकवटले आणि माझ्या वडिलांचा व्यवसाय यथापूर्व चालू ठेवण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. तिला स्वत:ला शिल्पकला अवगत नव्हती; ह्यापूर्वी तिने स्वत: कधी चित्रे मांडलेली नव्हती; तिने पूर्वी कधीही शिल्पांची डागडुजी केलेली नव्हती; प्रदर्शन सुरू करण्यापूर्वी कोणत्या कायदेशीर बाबी पूर्ण कराव्या लागतात ह्याची तिला स्वत:ला कल्पना नव्हती आणि प्रत्यक्ष प्रदर्शनाचे संचालन, व्यवस्थापन व निर्वहन तिने स्वत: पूर्वी कधीही केलेले नव्हते. असे असूनही तिने पतीच्या पश्चात 'मागील पानावरून पुढे चालू' असा जो निर्णय घेतला तो तिच्या भक्कम मनोवृत्तीचा व जबरदस्त आत्मविश्वासाचा द्योतक होता.

माझ्या आईने १९४६ ते १९५१ ह्या पाच-सहा वर्षांच्या काळात मुंबईतील नायगाव, वांद्रे, कुर्ला, माहीम व प्रभादेवी या ठिकाणी सालाबादप्रमाणे 'लेले चित्रकला प्रदर्शन' मांडले. १९४६ साली ती चित्रकला प्रदर्शन घेऊन आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथेही गेली होती (त्या वेळी माझे काका वि. बा. लेले यांनी तिला सहकार्य केले होते.) व महिनाभर राहिली होती. नंतर १९४८-४९ साली तिने सुरत येथेही प्रदर्शन मांडले होते, पण तेथे अनेक संकटे आल्यामुळे

तेथून मुंबईला लवकर परत यावे लागले होते. प्रदर्शनात नवीन शिल्पकृतींची भर पडण्याचे थांबल्यामुळे प्रेक्षकांची संख्या उत्तरोत्तर रोडावू लागली. हवामान व दीर्घकालीन हाताळणी या कारणांमुळे पुतळे खराब होऊ लागले. १९५० साली मी शालान्त परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण होऊन एकीकडे उच्च शिक्षण घेत दुसरीकडे स्वल्पसे अर्थार्जन करू लागलो होतो. ह्या साऱ्या परिस्थितीचा साकल्याने विचार करून माझ्या आईने लेले चित्रकला प्रदर्शनाचा व्यवसाय हळूहळू आवरता घेण्याचा कालोचित निर्णय घेतला. तदनुसार १९५१ साली मुंबईत जनतेला लेले चित्रकला प्रदर्शन अखेरचे पाहावयास मिळाले. त्यानंतर प्रदर्शनातील सर्व शिल्पकृती पेटाऱ्यांत भरून गोदामात ठेवून देण्यात आल्या. कालांतराने त्या भंग पावू लागल्याचे पाहून हळूहळू नष्ट करण्यात आल्या. अशा प्रकारे ज्या लेले चित्रकला प्रदर्शनाने एके काळी अक्षरशः हजारो प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले होते, त्यांना निखळ कलानंद देत-देत सामाजिक व राजकीय प्रश्नांची जाणीवही करून दिली होती आणि त्यांच्या हृदयात घर केले होते, ते लेले चित्रकला प्रदर्शन काळाच्या पडद्याआड कायमचे अंतर्धान पावले! आता उरल्या आहेत त्या त्याच्या काही उत्कट आठवणी. प्रस्तुत छोटेखानी पुस्तक म्हणजे त्या मनोज्ञ आठवणी पुन्हा मनात जागवण्याचा अल्प व विनम्र प्रयत्न.

## लेले चित्रकला प्रदर्शनाची मांडणी

प्रस्तुत पुस्तक वाचणाऱ्या आजच्या पिढीतील बहुसंख्य वाचकांना ते अपूर्व चित्रकला-प्रदर्शन पाहण्याची संधी कधीच मिळालेली नाही. त्यांच्या मनात त्या प्रदर्शनाची मांडणी कशी असे हे जाणून घेण्याची स्वाभाविकच उत्सुकता असेल. ती अंशतः शमावी म्हणून प्रदर्शनाच्या बाह्य स्वरूपाचे प्रथमतः वर्णन करतो.

प्रदर्शनासाठी २५ फूट रुंद व ५० फूट लांब असे मोकळे मैदान भाड्याने घेतले जात असे. त्यात खाचखळगे किंवा उंचवटे असल्यास ते सगळे बुजवून प्रथमतः सपाट केले जात असत. त्यानंतर त्या मैदानावर बांबू व वासे यांचा मंडप उभारण्यात येत असे. मंडप वरून ताडपत्र्यांनी आच्छादला जात असे. मंडपाच्या रुंदीच्या एका भागापैकी अर्धा भाग प्रेक्षकांच्या प्रवेशासाठी उघडा ठेवण्यात येत असे. बाकीचा रुंदीचा व लांबीचा सर्व भाग ताडपत्र्यांनी झाकून टाकला जात असे. मंडपाच्या मध्यभागी म्हणजे १२.५ फुटांवर सुमारे ४५ फूट लांबीची लाकडी पट्ट्यांची चौकट उभारण्यात येत असे. ह्या चौकटीला प्रत्येकी सहा फूट उंचीची व सहा फूट लांबीची सहा प्रवेशद्वारे ठेवण्यात येत असत. ह्या प्रत्येक प्रवेशद्वाराच्या मागे पुतळ्यांचा एकेक देखावा मांडण्यात येत असे. ही प्रवेशद्वारे वगळून बाकी सर्व चौकटीवर पांढरे स्वच्छ कापड खिळ्यांनी ठोकून बसविण्यात येत असे. १२.५ फुटांपुढे सुमारे पाच फूट अंतरावर लांबीच्या दिशेने दहा-दहा फुटांच्या

अंतराने लाकडी खांब जमिनीत पुरण्यात येत असत व खांबांच्या माथ्यांना असलेल्या मोठ्या भोकांत दोरखंड ओवून तो शेवटच्या खांबाभोवती गुंडाळण्यात येत असे. अशा प्रकारे दोरखंडी रेलिंग तयार करण्यात येत असे. प्रेक्षकांना शिल्पकृतींना सहजासहजी हात लावता येऊ नये हा हे रेलिंग बनवण्यामागील हेतू असे. रेलिंगच्या मागे उरलेल्या सात-साडेसात फुटांच्या पट्ट्यात उभे राहून प्रेक्षकांना प्रदर्शन पाहण्याची सोय असे. ह्या जागेच्या एका कोपऱ्यात पाण्याच्या दोन बादल्या व दुसऱ्या कोपऱ्यात वाळूची दोन लहान पिंपे ठेवून देण्यात येत असत. अचानकपणे मंडपाला आग लागल्यास ती चटकन विझवता यावी ह्यासाठी ही कायदेशीर तरतूद करून ठेवण्यात येत असे. प्रदर्शनातील ह्या प्रेक्षागृहात १०० वॅटचे बल्ब लावण्यात येत असत, त्यायोगे सर्वत्र भरपूर उजेड पडत असे व प्रेक्षकांना सर्व शिल्पकृती उत्तम रीतीने दिसू शकत असत. मंडपाच्या सभोवारच्या चार बाजूंपैकी रुंदीकडचा एक भाग अर्धा ताडपत्रीने झाकलेला असे व अर्धा उघडा असे. त्या उघड्या अर्ध्या भागात मध्यभागी सहा फूट रुंदीचे प्रवेशद्वार असे. त्याच्या मधोमध म्हणजे तीन फुटांवर लाकडी रेलिंग घालून एक आत जाण्याचा व दुसरा आतून बाहेर येण्याचा असे दोन मार्ग केलेले असत. प्रवेशद्वाराच्या बाजूला २' x २' असे चौकोनी खोकेवजा तिकीटघर असे, त्यात एक खुर्ची ठेवलेली असे. तिकिटे छापील असून त्यांवर Lele's Fine Art Works, Serial No व Entrance fee As. 2 असा मजकूर एकाखाली एक छापलेला असे. तिकीटघराला लागून उरलेल्या ४' x ६" जागेत एक स्थिर पुतळा मांडलेला असे; प्राय: पिवळी पगडी घातलेला मुंबईचा पोलीस किंवा वेणीविक्रेता हा पुतळा ठेवण्यात येत असे. प्रवेशद्वाराच्या वरच्या भागात लेले यांचे चित्रकला प्रदर्शन, Lele's Fine Art Works व लेलेनुं चित्रकळा प्रदर्शन असे अनुक्रमे मराठी, इंग्रजी व गुजराती भाषांत लिहिलेले वेगवेगळे कापडी फलक असत.

कोणत्याही शहरात प्रदर्शन मांडण्यापूर्वी त्या शहराची महानगरपालिका, अग्निशमन कार्यालय व पोलिस विभाग या खात्यांची प्रदर्शन उघडण्यासाठी लेखी परवानगी घ्यावी लागत असे. तसेच विद्युत मंडळाकडून तात्पुरते वीज-मीटर बसवून घ्यावे लागत असे. कधीकधी संबंधित खात्यांचे निरीक्षक स्वत: येऊन सर्व कायदेशीर तरतुदींची पूर्तता केली असल्याची खातरजमा केल्यावरच परवानगी देत असत. परंतु, माझ्या वडिलांचे ह्या सर्व खात्यांशी अतिशय सौहार्दाचे संबंध असल्यामुळे त्यांना कधीही त्रास किंवा गैरसोय सोसावी लागत नसे.

## प्रेक्षणीय शिल्पकृती

लेले चित्रकला प्रदर्शनात ज्या शिल्पकृती मांडण्यात येत असत त्यांपैकी एकही आता अस्तित्वात नाही. त्यामुळे आजच्या कलाप्रेमींना त्या पाहण्याची

संधी उपलब्ध नाही. त्यांपैकी तीन शिल्पांचीच छायाचित्रे आजमितीस उपलब्ध आहेत. इतर कृतींची वाचकाला काहीच कल्पना किंवा माहिती नाही. म्हणूनच येथे सर्वच शिल्पकृतींची माहिती विस्ताराने देत आहे. ती वाचून वाचकाला कल्पनेने एकूण प्रदर्शनच डोळ्यांसमोर उभे करता येईल.

प्रदर्शनात मांडण्यात येणाऱ्या शिल्पकृतींचे दोन प्रकार होते. काही शिल्पे हालती असत, ती देखाव्यांच्या आत मांडण्यात येत असत. काही शिल्पे न हालणारी म्हणजे स्थिर असत. अशी शिल्पे दर दोन देखाव्यांच्या बाहेरच्या मोकळ्या जागेत मांडण्यात येत असत. प्रथमतः देखाव्यांतील शिल्पांचे वर्णन करतो.

**महात्मा गांधींचे ऑपरेशन :** हा देखावा प्रदर्शनाचे सर्वाधिक महत्त्वाचे आकर्षण होते. महात्माजी येरवड्याच्या तुरुंगात असताना कर्नल मॅडॉक नावाच्या सर्जनने (१२.१.१९२४ रोजी) त्यांचे ॲपेंडिसायटिसचे ऑपरेशन केले होते. महात्माजींवर शस्त्रक्रिया होणार व तीही तुरुंगात होणार, ह्या बातमीने त्या काळात जनमानसात खूप खळबळ उडाली होती. ती शस्त्रक्रिया ही एक प्रकारे राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाची घटना होती. तिच्या मागची ही लोकभावना लक्षात घेऊन (प्रथमतः फडके यांनी व नंतर) माझ्या वडिलांनी त्या शस्त्रक्रियेचे दृश्य शिल्पांच्या माध्यमातून साकार करण्याचे ठरविले. ह्या देखाव्यात महात्माजींना ऑपरेशन टेबलावर ठेवण्यात आले आहे, त्यांच्या भोवती दोन डॉक्टर ऑपरेशनच्या पोशाखात व हातात आवश्यक त्या सुऱ्या-कात्र्या घेऊन उभे असून एक डॉक्टर महात्माजींना क्लोरोफॉर्म देत आहे, मागच्या बाजूने एक नर्स येत असून तिच्या हातातील ट्रेमध्ये शस्त्रक्रियेला लागणारी साधनसामग्री आहे, असे पुतळे असत. महात्माजींच्या श्वासोच्छ्वासाची हालचाल दाखविण्यात येत असे. नर्स ट्रे घेऊन चालत येत आहे अशी दुसरी महत्त्वपूर्ण हालचाल ह्या देखाव्यात असे. नर्स येऊन उभी राहिल्यावर मिनिटभरानंतर देखाव्याच्या बाहेरील पडदा बंद होत असे, अशा प्रकारे प्रेक्षकांना देखाव्यातील पुतळे क्षणभर पाहता येत नसत. त्या अल्प अवधीत नर्स पुन्हा मागे जात असे. त्यानंतर पडदा पुन्हा बाजूला सारला जात असे व मग प्रेक्षक पुन्हा एकदा समस्त पुतळ्यांचे दर्शन घेऊ शकत असत. नर्सचे जाणे, पडदा मिटणे, नर्सचे दृष्टीआड होणे, पुन्हा पडदा उघडणे व महात्माजींचे पोट हालणे ह्या हालचाली प्रेक्षकांना स्तिमित करीत असत. त्यामुळे ह्या देखाव्यापुढे प्रेक्षक बराच वेळ उभे राहत असत. परिणामी ह्या देखाव्यापुढे नेहमीच गर्दी असे. डॉक्टर व नर्स या पुतळ्यांचे ऑपरेशनच्या वेळचे पोशाख पाहून प्रेक्षकांना वास्तवाचा चांगलाच आभास होत असे.

**राधाकृष्ण मंदिर :** ह्या देखाव्याचे छायाचित्रखाली छापले आहे. त्याच्यावरून देखाव्याची पूर्ण कल्पना येईलच. परंतु ह्या देखाव्याची काही वैशिष्ट्ये नमूद करण्यासारखी आहेत. राधा व कृष्ण ह्या दोन्ही मूर्तींत कमालीचा गोडवा व

सात्त्विक भाव होता. त्यामुळे भाविकांना त्या मूर्ती फार भावत असत. पुजारी हातातील पोथीवर लक्ष केंद्रित करून ती वाचत आहे व तसे करताना त्याची मान हलत आहे, असे दाखवण्यात येत असे. त्याच्या चेहऱ्यावर भक्तिभाव झळकत असे. सभामंडपात बसलेल्या साधूच्या चेहऱ्यावर वैराग्य भासत असे. त्याच्या हातातील जपाची रुद्राक्षाची माळ त्याचे वैराग्य गडद करत असे. देखाव्याच्या मध्यभागी मृगाजिन अंथरलेले असे. त्याच्या योगे मंदिराच्या पवित्र वातावरणाला परिपूर्णता लाभत असे.



राधाकृष्ण मंदिर

**सेक्रेटरीचे कार्यालय :** एखाद्या सरकारी वा अन्य कार्यालयातील सेक्रेटरी टेबलापाशी बसला आहे; त्याच्या पुढ्यात टेबलावर फाईल व इतर कागदपत्रे आहेत; तो उजव्या हाताने कागदपत्रे चाळत आहे; इतक्यात फोनची घंटा वाजते; तो डाव्या हाताने रिसीव्हर उचलतो व कानाला लावतो. त्याच्या मागे अंगात काळा लांब कोट व डोक्यावर लाल पगडी घातलेला पट्टेवाला बसला असून तो हातातील दोरी खालीवर हालवून तिच्या दुसऱ्या टोकाला बांधलेल्या व सेक्रेटरीच्या डोक्यावर टांगलेल्या कापडी पंख्याला झोके देत आहे असे हे एकूण दृश्य असे. ह्यातील सेक्रेटरीचा हात व मान तसेच पट्टेवाल्याचा हात यांच्या हालचाली होत असत. सेक्रेटरीच्या चेहऱ्यावर अधिकारामुळे येणारा करारीपणा प्रतीत होत असे. पट्टेवाल्याच्या व सेक्रेटरीच्या पुतळ्यांच्या हालचाली प्रेक्षकांना चकित करीत असत.

**ग्रामीण जीवन :** खेड्यातील बांबूच्या झोपडीचा देखावा उभा केलेला असे. ह्या झोपडीतील मागील बाजूला शेतकऱ्याची बायको तांदूळ निवडत बसलेली आहे. सुपात ठेवलेले तांदूळ निवडताना तिचा उजवा हात मागे-पुढे फिरत आहे व डाव्या हाताने तिने सूप धरून ठेवले आहे, ह्या स्वयंपाकघराच्या बाहेरच्या खोलीत शेतकरी बसलेला असून त्याच्या हातात चिलीम आहे. तिला बांधलेले फडके धरून तो आपला उजवा हात खाली-वर करीत आहे; मधूनमधून मान हालवीत आहे. त्याच्या पुढ्यात फूटभर अंतरावर त्याचा लहान मुलगा आपल्या पुढ्यात असलेल्या कोंबडीला दाणे खाऊ घालत आहे. त्याने आपला डावा हात कोंबडीच्या पाठीवर ठेवलेला असून उजवा हात कोंबडीच्या चोचीखाली धरलेला आहे. कोंबडी चोचीच्या खालीवर हालचाली करून मुलाच्या हातातील दाणे टिपत आहे. पलीकडे शेतकऱ्याचा पाळीव कुत्रा बसलेला आहे, असा हा एकूण समग्र देखावा असे. ह्यातील शेतकरी व त्याची बायको यांच्या हाताच्या व डोक्याच्या हालचालींव्यतिरिक्त कोंबडीच्या मानेची खटकदार हालचाल दाखविण्यात आलेली असे. ह्या देखाव्यातील काळ्या रंगाचा कुत्रा इतका हुबेहूब असे की, हा क्षणभरात भुंकेल किंवा आपल्या दिशेने धावून येईल, असा सुखद आभास प्रेक्षकांना होत असे. शेतकऱ्यालगतच्या भिंतीत असलेल्या खिडकीच्या बांबूच्या पट्ट्यांच्या जाळीतून मागच्या बाजूला ठेवलेली गाडगी-मडकी दिसावीत अशी एकूण रचना केलेली असे.

**टिळकांचे अखेरचे आजारपण :** या देखाव्यात टिळक व गांधी या दोघांचेच पुतळे असत. टिळक अत्यवस्थ स्थितीत पलंगावर पडलेले आहेत. त्यांना श्वासोच्छ्वास करण्यास त्रास होत आहे. त्यांच्या शेजारी गांधीजी उभे असून ते टिळकांना वाकून नमस्कार करीत आहेत, असे एकूण हे दृश्य असे. गांधीजी पुढे वाकून टिळकांना नमस्कार करीत आहेत, ही या देखाव्यातील आकर्षक हालचाल असे. हा देखावा पाहून भारतीय राजकारणातील उगवता सूर्य मावळत्या सूर्याला जड अंत:करणाने अखेरचा प्रणाम करीत आहे, असा भास प्रेक्षकाला होऊन तो क्षणभर व्यथित होत असे.

**सीताहरण :** रावणाने केलेले सीतेचे अपहरण, त्या वेळी जटायूने रावणावर केलेला हल्ला व रावणाने केलेला जटायू-वध ह्या रामायणातील प्रसिद्ध कथाभागावर हा देखावा उभारण्यात आलेला असे. रावणाचा पुतळा आठ-साडेआठ फूट उंचीचा, मजबूत शरीरयष्टीचा व भयप्रद चेहऱ्याचा असा बनवलेला होता. सीतेला मूर्च्छा आलेली असून तिचा आडवा देह रावण आपल्या दोन्ही हातांवर उचलून नेत आहे आणि अंतरिक्षातून जटायू रावणावर झेप घालून येत आहे, असे एकूण दृश्य असे. या दृश्यात हालचाल नसे. पण रावणाच्या चेहऱ्यावरील क्रूरता,

सीतेच्या चेहऱ्यावरील म्लानता आणि प्लायवूडच्या रंगीत जटायूच्या डोळ्यांतील आवेश हे भाव प्रेक्षकांना थक्क करीत असत.

**सावकारी पाश :** सावकाराची पेढी दाखवलेली असे. डोक्याला फेटा बांधलेला व अंगात कमीज घातलेला सावकार हातात गुडगुडी धरून बसला आहे, त्याच्या जवळच त्याचा मुनीम बसलेला असून त्याने मोठी चोपडी उघडून ठेवलेली आहे; त्याच्या समोर एक गरीब शेतकरी उकिडवा बसलेला असून त्या चोपडीवर अंगठा उमटवीत आहे, असे दाखवलेले असे. मुनीम शेतकऱ्याच्या हातावर कमी रक्कम ठेवून अधिक रकमेवर त्याचा अंगठा घेत आहे आणि अशा प्रकारे मुनीम, सावकाराच्या सांगण्यावरून, त्या अशिक्षित शेतकऱ्याची फसवणूक करीत आहे, असा ह्या देखाव्याचा अर्थ असे. ह्या देखाव्यात कावेबाज सावकार, 'जी, हुजूर' करणारा त्याचा मुनीम आणि अगतिक शेतकरी या तिघांचे अतिशय प्रभावी दर्शन प्रेक्षकांना घडत असे.

**मद्यपान-निषेध :** दारूच्या दुकानाचा देखावा उभा करण्यात आलेला असे. त्यात दुकानाचा मालक डोक्यावर पारशी टोपी व हातात गुजराती वृत्तपत्र घेऊन बसलेला असून त्याचा सहायक गिऱ्हाईकाची वाट बघत शेजारीच बसलेला आहे; हे दोघे लाकडी कठड्याच्या मागे बसलेले असून त्या दोघांच्या मागच्या बाजूला



दारू दुकानावरील पिकेटिंग

निरनिराळ्या प्रकारच्या दारूची पिंपे मांडून ठेवलेली असल्याचे दाखवलेले असे. देखाव्यात प्रवेशद्वारापाशी सत्याग्रहाच्या चळवळीतील एक स्वयंसेविका सूतकताई करीत असून ती दुकानात येणाऱ्या दारूबाजांना परावृत्त करीत आहे, असा त्या दृश्याचा अर्थ असे. दुकानात गिऱ्हाईक नसल्यामुळे दुकानातील सहायकाला मधून-मधून डुलकी लागत असल्याचे दाखवलेले असे. त्याच्या मानेच्या त्या हालचाली प्रेक्षणीय असत.

**विश्वामित्र-मेनका :** हा देखावा मेनकाकृत विश्वामित्र-तपोभंग ह्या पौराणिक कथेवर आधारलेला असे. धगधगत्या यज्ञकुंडासमोर तपश्चर्या करीत बसलेल्या विश्वामित्राने डोळे मिटून घेतलेले आहेत. विश्वामित्राचा पुतळा देखाव्याच्या मागच्या भागात असून पुढच्या भागात मेनका उभी आहे. त्या दोघांच्या मध्ये एक जाळीदार पडदा आहे. मेनका मोहक पदन्यास करीत विश्वामित्राच्या समोर येऊन उभी राहते, तेव्हा विश्वामित्राचे लक्ष विचलित होते; तो डोळे उघडून मेनकेकडे पाहतो; तिच्या असामान्य लावण्यामुळे तिच्यावर मोहित होतो व अशा प्रकारे त्याचा तपोभंग होतो असे हे दृश्य असे. विश्वामित्र व मेनका ह्यांच्या ह्या हालचाली आलटून-पालटून दाखविण्यात येत असत. त्या पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध होत असत.

**श्रीकृष्ण-जन्म :** हाही एक पौराणिक देखावा असे. नुकत्याच जन्मलेल्या बालकृष्णाला घेऊन वसुदेव व देवकी कंसाच्या कारागृहातून निसटून यमुनेच्या रोखाने जात आहेत, कारागृहाबाहेरचा पहारेकरी डुलक्या घेत आहे, त्यामुळे वसुदेव व देवकी यांची अनायासे सोय झाली आहे, असे एकूण हे दृश्य असे. यातील डुलक्या घेत असलेला पहारेकरी बघण्यासारखा असे.

अशी एकूण दहा सांघिक पुतळ्यांची दृश्ये होती. ह्यांना माझे वडील प्लॉट्स (Plots) म्हणत असत. प्रत्येक प्रदर्शनात फक्त सहाच प्लॉट्स मांडण्यात येत असत. तसे करताना वरील दहांपैकी सहांची आलटून-पालटून निवड करण्यात येत असे. दर दोन देखाव्यांमध्ये एक न हालणारे शिल्प मांडण्यात येत असे हे वर म्हटलेच आहे. अशा स्थिर शिल्पांची आता थोडी माहिती देतो.

अशा शिल्पकृतींत मुंबईचा पोलीस, वेणीविक्रेता, फळफळावळ विकणारा, वसईचा दूधवाला, मुंबईचा पाटीवाला, घड्याळे दुरुस्त करणारा, इत्यादींचा समावेश होता. ह्यांपैकी मुंबईचा पोलीस हे शिल्प अतिशय लोकप्रिय झालेले होते. त्याचा निळा पोशाख, कमरेचा चामड्याचा पट्टा, डोक्यावरची पेढेघाटी पिवळी पगडी इत्यादींमुळे जणू जिवंत पोलीस उभा आहे असा भास होत असे. फळविक्रेत्यापुढे ठेवण्यात येत असलेली प्लॅस्टरची फळे एकदा हातात घेऊन उचलून पाहावीत असा मोह प्रेक्षकांना होत असे. दुधाच्या घागरींची कावड खांद्यावर घेतलेला, डावा हात कावडीवर ठेवलेला आणि डोक्यावर लाल रंगाची

गोलाकार टोपी घातलेला असा वसईच्या दूधवाल्याचा पुतळा कमालीचा सजीव भासत असे.

माझ्या वडिलांनी लोकमान्य टिळकांचा अर्धपुतळा (bust) बनवला होता. त्याचे एन. व्ही. वीरकर नावाच्या छायाचित्रकारांनी एक छायाचित्र काढले होते. ते खाली छापले आहे. सदरहू अर्धपुतळा म्हणजे माझ्या वडिलांच्या अपूर्व कलाकौशल्याची जणू विजयपताकाच होय! सगळेच पुतळे इतक्या कौशल्याने बनवलेले असत की, ते निर्जीव पुतळे नसून सजीव माणसेच आहेत, असा सुखद भास पाहणाऱ्यांना होत असे. ह्यातच लेले चित्रकला प्रदर्शनाच्या मोहिनीचे रहस्य दडलेले होते.



## माझ्या वडिलांची समाजाभिमुखता

येथवर शिल्पकार केशव बाबुराव लेले यांचा विस्ताराने परिचय करून दिला. तो देताना त्यांनी शिल्पांसाठी निवडलेल्या विषयांतून त्यांची समाजाभिमुखता प्रत्ययास आलीच (उदाहरणार्थ, ग्रामीण जीवन, सावकारी पाश, मद्यपान-निषेध इत्यादी देखावे शिल्पकाराला असलेल्या सामाजिक जाणिवेचे निदर्शक होते). पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या ह्या पैलूची आणखीही एखाद-दोन उदाहरणे आवर्जून देण्यासारखी आहेत.

दादरला डी. एल. वैद्य रोडवर ब्राह्मण सहायक संघ आहे. तेथे आश्विन महिन्याच्या शुक्ल अष्टमीच्या दिवशी रात्री महालक्ष्मीपूजनाचा उत्सव होतो. पूजेसाठी महालक्ष्मीची पूर्णाकृती मूर्ती नसल्याचे माझ्या वडिलांच्या कोणीतरी निदर्शनास आणून दिले. त्यांनी स्वत:च्या संग्रहातील महालक्ष्मीचा पूर्णाकृती पुतळा तत्काळ मंडळाला भेट म्हणून दिला. इतकेच नव्हे तर महाष्टमीच्या दिवशी संध्याकाळी ते स्नान करून देवीचा उकडीचा मुखवटा स्वत: करून देण्यास उत्स्फूर्तपणे जाऊ लागले. ही प्रथा त्यांनी आमरण पाळली. देवीच्या प्लॅस्टरच्या पुतळ्यामुळे मंडळाची एक गरज कायमची भागली.

माझ्या आईच्या मामींचे - श्रीमती रमाबाई बळवंत जोशी यांचे - ठाणे शहरात एक उपाहारगृह होते. त्याच्या संबंधात कोर्टात एक खटला उभा राहिला. श्रीमती जोशी यांना मदत करणारे कोणीही नव्हते. माझ्या वडिलांनी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरविले. खटल्याच्या निमित्ताने माझ्या वडिलांच्या ठाण्याला फेऱ्या सुरू झाल्या. त्यांनी श्रीमती जोशींना योग्य वकील गाठून दिला; पदरमोड करून खटला चालवला, जिंकला व श्रीमती जोशींना चिंतामुक्त केले. एवढेच नव्हे तर त्यांची पुण्याच्या हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेमध्ये शिक्षणाची सोय करून दिली. श्रीमती जोशींनी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता संपादन केली, नगरला प्राथमिक शाळेत नोकरी धरली आणि कालांतराने तेथूनच त्या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या. अशा प्रकारे माझ्या वडिलांनी एका निराधार विधवा स्त्रीला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी केले. श्रीमती जोशी माझ्या वडिलांबद्दल नेहमीच कृतज्ञता व्यक्त करीत असत.

आर्थिक अडचणीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला माझे वडील तत्परतेने मदत करीत असत. गरजू नातलगांना ते जामीनही राहत असत. कधीकधी नातलग कर्जाची परतफेड करू शकत नसत. अशा प्रसंगी माझे वडील ती कर्जफेड स्वत: करीत असत. अशा प्रकरणी त्यांचे जे आर्थिक नुकसान होत असे ते ते आनंदाने सहन करीत असत.

माझ्या दोन मामांना दुसरीकडे चांगल्या नोकऱ्या मिळेपर्यंत माझ्या वडिलांनी स्वत:च्या प्रदर्शनाच्या कामासाठी ठेवून घेतले, यथोचित आर्थिक मोबदला दिला आणि त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळाल्यावर लगेच बिनतक्रार कार्यमुक्तही केले. अशा प्रकारे त्या दोघांना मासिक कमाईवाचून राहावे लागू नये, अशी माझ्या वडिलांनी काळजी घेतली.

ह्या बाबतीत आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. माझ्या वडिलांच्या अमेरिकेच्या दौऱ्यासंबंधी ह्यापूर्वी विस्ताराने लिहिलेच आहे. त्या दौऱ्याच्या दरम्यान त्यांना अशी माहिती कळली की, हिंदी लोक व हिंदुस्थान असोसिएशन यांना अमेरिकन नागरिक सक्रिय व आर्थिक सहकार्य करीत आहेत. माझ्या वडिलांनी ह्या माहितीची खातरजमा करून घेतली आणि भारतात परतल्यावर

मुंबईच्या 'नवा काळ' दैनिकाला एक मुलाखत देऊन आपल्याला मिळालेली माहिती मराठी वाचकांपर्यंत नेऊन पोचवण्याची सामाजिक जबाबदारी स्वयंप्रेरणेने पार पाडली. ती महत्त्वाची माहिती थोडक्यात अशी :

अमेरिकेतील डिट्रॉइट (मिशिगन राज्य) येथील हेन्री फोर्ड यांच्या मोटारींच्या कारखान्यात नोकरीस असलेल्या त्याचप्रमाणे अमेरिकेत निरनिराळ्या व्यवसायांच्या निमित्ताने जाऊन राहिलेल्या भारतीय लोकांनी नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर यांच्या 'संगीत मानापमान' नाटकाचे प्रयोग इंग्रजीत सुरू केले होते. ते नाटक अमेरिकेत बरेच लोकप्रिय झाले होते. फेब्रुवारी १९२७ पर्यंत त्याचे सुमारे पंधरा प्रयोग झाले होते. नाटकातील भाषणे व पदे यांचे इंग्रजीत भाषांतर करण्यात आले होते. नाटकातील पुरुषपात्रांची कामे भारतीय करीत असत तर स्त्री-पात्रांची कामे अमेरिकन स्त्रिया करीत असत. असे हे खऱ्या अर्थाने इण्डो-अमेरिकन प्रयोग होत असत. नाटकातील पेहराव, हावभाव इत्यादी सर्व बाबी भारतीय पद्धतीच्याच ठेवण्यात आल्या होत्या. नाटकाची फक्त भाषा इंग्रजी होती. त्यामुळे हिंदू समाजाचे चित्र या दृष्टीनेच अमेरिकन स्त्रीपुरुष प्रेक्षकांना हे नाटक पाहावेसे वाटत असे. नाट्यप्रयोगासाठी लागणारे प्रेक्षागृह व इतर आवश्यक गरजा यांची पूर्ती अमेरिकन लोक सहकार्याच्या भावनेने करीत असत. नाटकाच्या लोकप्रियतेमुळे प्रेक्षकांची गर्दी वाढत होती, त्यामुळे नाटकाला चांगले उत्पन्न होत असे. अमेरिकन लोक हे उत्पन्न हिंदी लोक व हिंदुस्थान असोसिएशन यांच्या मदतीसाठी देत असत. [२८]

एकंदरीने माझ्या वडिलांना समाज-हिताविषयी आस्था होती. त्यामुळे तशा प्रकारच्या उपक्रमाला ते तत्परतेने साहाय्य करीत असत.

## दिनचर्या

आता त्यांच्या दिनचर्येची माहिती करून घेऊ.

माझ्या वडिलांनी स्वतंत्रपणे व्यवसायाला सुरुवात केल्यावर आरंभी त्यांचे वास्तव्य दादर येथील पोर्तुगीज चर्चजवळील पिण्टो व्हिला शाळेसमोरील घरात होते. कालांतराने त्यांनी तेथून काळे गुरुजी मार्गावरील शास्त्री बिल्डिंगमध्ये स्थलांतर केले. तेथे ते १९३६ पर्यंत राहिले. त्या वर्षी त्यांनी दादरमधील रानडे रोडवरील लक्ष्मीप्रसाद (ह्याचेच पुढे सरस्वती-महाल नं. २ असे नामांतर झाले) या इमारतीतील तळमजल्यावरचा 'सी' ब्लॉक भाड्याने घेतला व त्यांचे शेवटपर्यंत वास्तव्य तेथेच होते.

प्रदर्शनाच्या निमित्ताने माझे वडील वर्षाकाठी सात-आठ महिने मुंबईबाहेर राहत असत. त्यांचा मुक्काम जेव्हा मुंबईत असे तेव्हा त्यांची दिनचर्या सामान्यपणे अशी असे :

ते पहाटे लवकर उठून मुखमार्जनादी करून व चहापान करून थोडा वेळ वृत्तपत्र वाचत असत. नंतर प्रथमत: आदल्या दिवसाच्या जमाखर्चाच्या नोंदी अगोदर रोजमेळीत व नंतर खातेवहीत करीत असत. ही त्यांची कायमची प्रथा होती. आमच्या घरात अशा अनेक वर्षांच्या कीर्दखतावण्या होत्या. माझ्या वडिलांचे मोडी तसेच बाळबोध अक्षर नेटके होते.

हिशोब लिहिण्याचे काम झाल्यावर ते सरळ मातकामाला बसत असत. ही कामे दोन प्रकारची असत : एखादी ऑर्डर पुरी करण्याचे काम किंवा नवीन पुतळे बनविण्याचे काम. ऑर्डरची दोन कामे मला आठवतात. घड्याळांची विक्री करणाऱ्या एका कंपनीने एका छोट्या स्त्री-पुतळ्यासकट घड्याळे विकण्याचे ठरविले. घड्याळांचा भरपूर खप व्हावा ह्यासाठी जाहिरातीची अशी कल्पना करण्यात आली होती. हे काम माझ्या वडिलांवर सोपविण्यात आले होते. ६ इंच लांब, ४ इंच रुंद व ७ इंच उंच अशा प्लॅस्टरच्या ठोकळेवजा बैठकीवर एक आधुनिक स्त्री बसलेली असून ती त्या बैठकीच्या मध्यभागी गोलाकार भोकात बसवलेल्या घड्याळाकडे अंगुलिनिर्देश करून वेळ दाखवीत आहे, असे ते छोटेसे शिल्प होते. घड्याळाच्या वरच्या बाजूला Time is money हे वाक्य लिहिलेले असे. सगळे शिल्प तैल रंगात रंगवलेले असे. प्रत्येक शिल्पाला वेगळा रंग दिलेला असे. माझ्या वडिलांनी प्रथमत: मातीचे शिल्प बनवले, मग त्याचा साचा बनवला आणि त्यानंतर त्या साच्यातून प्लॅस्टरचे ओतीव काम करून अनेक शिल्पकृती काढल्या. जाहिरातीच्या ह्या शिल्पाचा खूप खप झाला. काही दिवस आमच्या घरात अनेक घड्याळे हारीने लावून ठेवण्यात आली होती.

आणखी एका शिल्पाची आठवण येते. बाबुलीन ह्या बालकांच्या टॉनिकच्या बाटलीच्या पुठ्ठ्याच्या खोक्यावर एका गुटगुटीत बालकाचे छायाचित्र आपण पाहतो. ते छायाचित्र त्या बालकाच्या मूळ शिल्पावरून तयार केलेले आहे. सुमारे साठ वर्षांपूर्वी ते मूळ शिल्प माझ्या वडिलांनी बनवले होते. ते पुरे झाल्यावर आमच्या घरी आलेल्या सर्वांनी ते पाहिले व त्याची खूप प्रशंसा केली. नंतर बाबुलीन कंपनीचे मालक येऊन ते शिल्प घेऊन गेले. ही झाली ऑर्डरची शिल्पे.

माझ्या वडिलांनी आपल्या भक्तिभावनेला मूर्त रूप देण्यासाठी म्हणून श्रीकृष्ण व श्री. दत्तात्रेय या देवांच्या सुमारे दीड फूट उंचीच्या प्लॅस्टरच्या अतिशय सुबक मूर्ती बनवल्या होत्या. दोन्ही मूर्ती चतुर्भुज असून प्रसन्नवदन होत्या. दत्तात्रेयाच्या मूर्तीच्या मागे छोटी गाय व पायापाशी चार कुत्रे दाखवण्यात आले होते. देवांच्या ह्या दोन्ही मूर्ती लाकडी स्टॅण्डवरील काचेच्या शोकेसमध्ये सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या होत्या. देवता, गाय व कुत्रे ह्या सर्वच मूर्ती अतिशय सुरेख होत्या. गायीचे व कुत्र्यांचे (वेगवेगळ्या रंगांतील रंगकाम) अप्रतिम होते.

एकदा आठ-दहा इंच उंचीच्या गायीच्या मूर्ती बनवण्याच्या कल्पनेने माझ्या वडिलांच्या मनाची पकड घेतली. त्यांनी लगेच मातकामाला सुरुवात केली.

आठवडाभरात गायीचा साचा तयार झाला आणि आणखी आठवडाभराने आमचे घर गायींच्या वीस-पंचवीस शिल्पांनी भरून गेले. या शिल्पांची चांगली विक्री झाली. वडिलांनी प्रत्येक गो-शिल्पाला वेगळा रंग दिलेला होता. त्यामुळे ह्या शिल्पांकडे पाहात राहावे अशी ती देखणी झाली होती. गाईंच्या या खिल्लाराकडे बघणे हा एक वेगळाच आनंद देणारा अनुभव होता!

माझ्या वडिलांचा वेळ अशा आवडीच्या शिल्पकामात प्राय: जात असे. तोच त्यांचा विरंगुळा होता. तेच त्यांचे जीवनसंगीत होते. त्या कामात ते तल्लीन होऊन जात असत.

दुपारी बारा-साडेबारापर्यंत त्यांचे हे शिल्पकाम चालत असे. ते झाल्यावर जमिनीवर माती वगैरे सांडलेली असल्यास तिची साफसफाई करून नंतर स्नान करीत असत. स्नानानंतर भगवद्‌गीतेचा एक अध्याय वाचण्याचा त्यांचा नेम असे. त्यात कधीही टाळाटाळ होत नसे. त्यानंतरच त्यांचे भोजन होत असे. दुपारची विश्रांती झाली की पुन्हा त्यांच्या कामास सुरुवात होत असे.

माझ्या वडिलांना आळस ठाऊक नव्हता. सतत चोवीस तास काम करण्याची शारीरिक क्षमता त्यांच्या अंगी होती. असा प्रसंग वर्षातून एकदा येतच असे. कुर्ला येथील वार्षिक जत्रेत मांडलेले प्रदर्शन गुंडाळून माहीमच्या उरसात ते मांडण्यास त्यांना फक्त चोवीस तासांचा अवधी मिळत असे. पण माझे वडील न थकता ही दोन्ही कामे अक्षरश: रात्रीचा दिवस करून व्यवस्थितपणे पार पाडत असत. त्यांचा हा कष्टाळूपणा विलक्षणच होता. त्यामुळे लेले चित्रकला प्रदर्शन वेळेवर उघडले नाही, असे कधीही होत नसे. वेळेचे बंधन पाळणे हा त्यांचा स्वभावधर्म होता.

माझे वडील सतत कार्यमग्न असल्यामुळे गप्पाटप्पा मारण्यासाठी त्यांच्यापाशी फावला वेळच नसे. त्यांना तसे फारसे मित्रही नव्हतेच. मात्र श्री. काशिनाथ त्र्यंबक लेले हे माझ्या वडिलांचे जीवश्चकण्ठश्च मित्र होते (तसे ते दूरचे नातलगही होते.) धोतर, पांढरा शर्ट, त्याच्यावर पिवळसर रंगाचा कोट, नाकावर सोनेरी काडीचा चष्मा असा एकूण त्यांचा थाट असे. ते घरात आले की अत्तराचा घमघमाट सुटे. त्यांना माझे वडील काशाभाऊ म्हणत असत आणि ते माझ्या वडिलांना केसू म्हणत असत. का.त्र्यं. लेले आमच्या घरी आठवड्यातून एकदा तरी अवश्य येत असत. ते आले की माझे वडील हातातील काम बाजूला ठेवून देत असत आणि मग दोघेही गप्पांत रंगून जात असत; एकमेकांच्या सहवासात सुखावत असत. काशाभाऊंना एक कप चहा अवश्य लागत असे - मग दिवसाची कोणतीही वेळ असो. माझ्या वडिलांना विडीकाडी, पान, तंबाखू,मद्य ह्यांपैकी कोणतेही व्यसन नव्हते. काशाभाऊ कधीकधी सिगारेट, पण अनेकदा विडी ओढत असत. पण काशाभाऊंचे हे धूम्रपानाचे व्यसन माझे वडील खपवून घेत असत. किंबहुना काशाभाऊंना सबकुछ माफ होते.

अहमदाबादचे एक गुजराती गृहस्थ माझ्या वडिलांचे असेच परममित्र होते. माझ्या वडिलांना गुजराती भाषा उत्तम बोलता येत असे. त्यामुळे माझ्या वडिलांच्या त्या गुजराती गृहस्थांशीही खूप गप्पा होत असत.

माझ्या वडिलांच्या निधनाची बातमी कळल्यावर ते गुजराती गृहस्थ आमच्या सांत्वनासाठी अहमदाबादहून मुद्दाम आले होते आणि अक्षरश: ढसढसा रडले होते. त्या प्रसंगी का.त्र्यं. लेले यांनाही अनावर दु:ख झाले होते.

जरी माझ्या वडिलांचा मित्रपरिवार मर्यादित होता तरी त्यांच्या व्यवसायामुळे त्यांना ओळखणारी शेकडो माणसे होती आणि त्या सर्वांना माझ्या वडिलांबद्दल आदर वाटत असे.

माझ्या वडिलांची राहणी अगदी साधी असे. घरात ते धोतर व मलमली कुडता या पोशाखात असत. बाहेर जाताना शर्ट घालत असत व टोपी अवश्य वापरत असत.

## कौटुंबिक जीवन

सरतेशेवटी माझ्या वडिलांच्या कौटुंबिक जीवनाविषयी लिहून हे चरित्रलेखन संपवितो.

माझ्या वडिलांचे वडील कै. बाबुराव वामन लेले यांच्याविषयी जी माहिती आजघडीस उपलब्ध आहे ती ह्या चरित्राच्या पूर्वज ह्या पहिल्याच सदरात दिली आहे. माझ्या वडिलांचे मोठे बंधू कै. गणेश बाबुराव लेले ह्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाचे वर्णन 'प्रतिभाशाली बंधू कवी 'मोरया' ह्या मथळ्याखाली केले आहे.

माझ्या वडिलांचे धाकटे बंधू कै. विनायक बाबुराव लेले यांचा जन्म १९०५ साली झाला. तेदेखील शिल्पकाराचा व्यवसाय करीत असत. ते माती, प्लॅस्टर, दगड व धातू यांचे पुतळे बनवीत असत. आळंदीच्या ज्ञानेश्वर मंदिरातील गरुड व मारुती यांच्या दगडाच्या मूर्ती त्यांच्या हातच्या आहेत. पुणे येथील रमणबागेतील शाळेवर असलेला डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक कै. नामजोशी यांचा ब्रॉंझ धातूचा पुतळा, पुण्याचे प्रसिद्ध सराफ कन्हैय्यालाल यांनी अप्पा बळवंत चौकात बांधलेल्या देवळातील राधाकृष्णाची मूर्ती, आयुर्वेद रसशाळेतील श्रीधन्वंतरीची मूर्ती इत्यादी सर्व शिल्पे त्यांनीच बनवलेली आहेत. हे पूर्वी पुण्यात राहत असत.[२९] कालांतराने त्यांनी वसईला स्थलांतर केले व तेथेच त्यांचे १७.१०.१९६२ रोजी देहावसान झाले. माझ्या वडिलांचे सगळ्यांत धाकटे बंधू कै. वासुदेव बाबुराव लेले यांचे शालेय व महाविद्यालयीन सर्व शिक्षण माझ्या वडिलांनीच केले. कै. वासुदेवराव मुंबई विद्यापीठाचे बी.ए. (ऑनर्स) होते. त्यांनी काही काळ मुंबई महानगरपालिकेत नोकरीही केली. परंतु, ते लवकरच क्षयाने आजारी पडले व त्यातच त्यांचा ऐन तारुण्यात अकाली अंत झाला. माझ्या दोन्ही आत्यांबद्दलची

माहिती पूर्वी येऊन गेलीच आहे.

माझ्या वडिलांना आपली आई व मोठी बहीण येसूताई शेवडे या दोघींविषयी अतिशय प्रेम वाटत असे. माझी आजी (वडिलांची आई) अभागिनी होती. तिला आपले यजमान, जावई (येसूताई शेवडे यांचा नवरा) व मोठा मुलगा (गणेश बाबुराव लेले) अशा तीन कर्त्या पुरुषांचे निधन बघावे लागले होते. त्यामुळे ती दु:खीकष्टी होती. येसूताई शेवडे यांचे वयाच्या दहाव्या वर्षी लग्न झाले होते आणि त्यांना अकराव्या वर्षीच दुर्दैवाने वैधव्य आले होते. (जरी त्यांना त्यांचे पुतणे - वामनराव व श्रीधरपंत शेवडे - मधूनमधून राजापूरला सासरी घेऊन जात असत तरी त्यांचे कायमचे वास्तव्य मुटाटला माहेरीच होते.) अशा प्रकारे मायलेकी समदु:खी होत्या. त्यांना समजून घ्यावयास हवे, त्यांची वरचेवर विचारपूस करून त्यांचे दु:ख दूर करावयास हवे आणि त्यांचे जीवन सुसह्य करावयास हवे, अशी माझ्या वडिलांची त्या दोघींविषयी भूमिका होती. तदनुसार ते दरमहा त्या दोघींना व्यवस्थितपणे राहता येईल इतक्या रकमेची मनीऑर्डर करीत असत, दर आठ-पंधरा दिवसांनी पत्र लिहून त्यांची खुशाली विचारीत असत आणि वर्षाकाठी त्यांच्या वस्त्रप्रावरणांची तरतूद करीत असत. माझ्या वडिलांना त्या दोघींना भेटण्याची मधूनच उत्कट इच्छा होत असे. एकदा तर ऐन आषाढात बाहेर मुसळधार पाऊस पडत असताना त्यांनी बॅग भरली आणि मुंबई ते पुणे व पुणे ते कोल्हापूर असा रेल्वेने आणि कोल्हापूर ते दाजीपूर, दाजीपूर ते तरळे व तरळे ते मुटाट असा बसने प्रवास करून ते आपल्या आईला व बहिणीला भेटावयास गेले. त्यांनी माझ्या मुंजीत १९४२ साली आपल्या आईला मुंबईला आणले आणि तिला अतिशय मानाने व आदराने वागविले. कोकणातील घर मोडकळीस आल्यामुळे पावसाळ्यात घरात पाणी गळते व त्यामुळे आपल्या आईची व बहिणीची खूप गैरसोय होते, ही वस्तुस्थिती माझ्या वडिलांच्या लक्षात आल्याबरोबर त्यांनी सुतार, गडीनोकर व घरदुरुस्तीसाठी आवश्यक ते सामान मुंबईहून मुटाटला नेले, घराचे आढे बदलले, घराच्या काही भागाचे नूतनीकरण केले आणि इतर भागाची उत्तम प्रकारे दुरुस्ती केली. एकंदरीने ते आपली आई व बहीण ह्यांच्या सुखदु:खांविषयी केवळ कर्तव्यतत्परच नव्हते तर काहीसे हळवे होते.

माझ्या वडिलांना मुटाट गाव, तेथील आप्तेष्ट, गावकरी इत्यादी सर्वांविषयी ओढ वाटत असे. गावी गेल्यावर ते तेथील सर्व नातलगांची उन्मेखून भेट घेत असत आणि त्यांच्याशी सुखदु:खांची देवाणघेवाण करीत असत.

माझी आई १९३७ साली पक्षाघाताने आजारी पडली. तिच्या शरीराची एक बाजू लुळी पडली होती. तिची ती स्थिती पाहून माझ्या वडिलांचा धीर सुटला होता. तेव्हा रॉड्रिग्ज् नावाच्या एका डॉक्टरांनी माझ्या वडिलांना धीर दिला, तिच्यावर योग्य औषधोपचार केले आणि तिला त्या दुखण्यातून केवळ उठवले

नाही तर खडखडीत बरे केले. (त्यानंतर ५५ वर्षे माझी आई जगली.)

माझ्या आईच्या त्या दुर्धर दुखण्यात माझ्या वडिलांनी तिची अपार सेवा केली. तिची खूप काळजी घेतली; डॉक्टरांनी सुचवलेले सर्व उपचार दक्षतेने केले आणि तिला जणू पुनर्जन्म दिला. दैनंदिन जीवनातही ते तिच्याशी प्रेमाने वागत असत आणि तिच्या सर्व हौशी पुऱ्या करीत असत.

माझ्या आईने माझ्या वडिलांच्या पश्चात चित्रकला प्रदर्शनाचा व्यवसाय सुमारे सहा वर्षे कसा खंबीरपणे चालू ठेवला आणि आपल्या मुलांच्या शिक्षणाची व पालनपोषणाची जबाबदारी कशी नेटाने पार पाडली त्याचे वर्णन मागे 'खेळ चालू राहिला पाहिजे' ह्या सदरात केलेच आहे. येथे तिच्या स्वभावाच्या इतर वैशिष्ट्यांचा उल्लेख करतो. माझे वडील प्रदर्शन घेऊन जेव्हा मुंबईबाहेर जात असत तेव्हा अनेकदा माझी आईही त्यांच्याबरोबर जात असे. अशा प्रकारे तिला अनेक शहरे पाहण्याची संधी मिळाली होती. तिला प्रवासाची आवडही होती. ह्या देशाटनामुळे तिला मानवी स्वभावाच्या विविधतेची व व्यावहारिक जगाच्या रीतीची चांगली ओळख झाली. अनुभवाची ही शिदोरी तिला व्यवसायाची जबाबदारी स्वतंत्रपणे पेलताना खूप उपयोगी पडली. ती वडिलांच्या गैरहजेरीत प्रपंचाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत असे. तिचे सासरच्या व माहेरच्या अशा दोन्हीकडच्या नातलगांशी आपुलकीचे संबंध होते. अडीअडचणीच्या वेळी नातलगांना व इतरांनाही मदत करण्यास ती तत्परतेने धावून जात असे. तिला पाककलेत व विशेषेकरून वेगवेगळ्या पदार्थांच्या (उदा. टॉमॅटो, बटाटा, आले, दही, श्रीखंड, भोपळा इत्यादींच्या) वड्या करण्याची खास आवड होती. तिने रुखवताच्या साखरेच्या वस्तू बनविण्याची कला आत्मसात केली होती आणि ती अशा वस्तू इतरांना हौशीने करून देत असे. फुले व दागदागिने यांची हौस, स्वच्छता व नीटनेटकेपणा ही तिच्या व्यक्तिमत्त्वाची अन्य वैशिष्ट्ये होती. ती २९ एप्रिल १९९२ रोजी दादर येथे राहत्या घरी वयाच्या ७८ वर्षी कॅन्सरने कालवश झाली.

माझ्या आई-वडिलांनी घरातल्या माणसांना देतात तशीच वागणूक नोकरांना दिली. त्यामुळे त्यांचा समावेश आमच्या नातलगांतच करावयास हवा. आमच्या घरी (वडिलांचे शिल्पांचे काम सतत चालूच राहत असल्यामुळे आमच्या घराला 'कारखाना' म्हणत असत.) सखाराम मेस्त्री, जानू व मोहन किसन भावसार हे तीन सहायक असत. ह्यांपैकी सखाराम व जानू हे कोकणातले असून मोहन मुंबईकर होता. प्रदर्शनाचे सामान आमच्या राहत्या ब्लॉकच्या मागील बाजूस असलेल्या गोदामात ठेवण्यात येत असे. तेथेच सखाराम व जानू हे दोघे राहत असत. मोहन आपल्या मुलाबाळांसकट वेगळा राहत असे. सखाराम हा कसबी सुतार होता. प्रदर्शनाला लागणाऱ्या सर्व सुतारकामाची - लाकडी चौकटी उभ्या करणे, देखाव्यांसाठी पडदे बनवणे, पुतळ्यांसाठी टेबल, खुर्च्या, स्टँड इत्यादी बनवणे या सर्व कामांची - जबाबदारी सखारामवर असे. ती सांभाळण्यात तो

वाकबगार होता. प्रदर्शन चालू असताना तो तिकीट-विक्रीचे कामही करीत असे. झाडलोट, सामानाची ने-आण इत्यादी कामे जानूची असत. निरोप पोचवणे, वेगवेगळ्या कार्यालयांत जाऊन कागदपत्रे देणे, पडद्यांचे मामुली पेंटिंग करणे आणि प्रदर्शन चालू असताना जाहिरात करणे इत्यादी विविध प्रकारची कामे मोहन हुशारीने करीत असे. हे तिघेही नोकर कमालीचे कष्टाळू, अतिशय प्रामाणिक आणि माझ्या आईवडिलांबद्दल प्रेमादर बाळगणारे होते. ह्या निष्ठावान सेवकांचे हार्दिक व अकृत्रिम सहकार्य असल्यामुळेच माझ्या आईला माझ्या वडिलांच्या निधनानंतर तब्बल सहा वर्षे प्रदर्शनाचा व्यवसाय निर्वेधपणे करणे शक्य झाले. ह्याबाबतीत माझ्या आईचे एक नातलग श्री. गजानन दत्तात्रय ऊर्फ भाऊसाहेब जोशी यांचेही अमोल साहाय्य झाले, हे नमूद करावयास हवे.

मी व माझे धाकटे बंधू श्री. यशवंत केशव लेले अशी आम्ही दोनच भावंडे. माझ्या वडिलांच्या चरित्राला पूर्णता यावी म्हणून आता आम्हां दोघांविषयी थोडक्यात माहिती देतो.

माझ्याविषयीची माहिती :

वामन केशव लेले (जन्म - मुंबई, २९ मे, १९३३)

शैक्षणिक योग्यता : बी.ए. (मुंबई विद्यापीठ, प्रथम श्रेणी, १९५४), एम.ए. (मुंबई विद्यापीठ, प्रथम श्रेणी, १९५६ - मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल न. चिं. केळकर सुवर्णपदक प्राप्त), पीएच.डी. (पुणे विद्यापीठ, १९७०; प्रबंध मुद्रित स्वरूपात सादर; परीक्षक : कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व कै. प्रा. रा.ब. आठवले; प्रबंधाला पुणे विद्यापीठाची न.चिं. केळकर व डॉ. य.वि. परांजपे ही पारितोषिके मिळाली; प्रबंध 'भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ति : प्रथम युग' या शीर्षकाने पुस्तकरूपात प्रसिद्ध).

सगळे महाविद्यालयीन शिक्षण पेडणेकर सुइंग मशीन कंपनी व एल.आय.सी.मध्ये पूर्ण वेळ नोकरी करून संपादन केले.

१९५७ ते १९६१ श्री. ना.दा.ठा. महिला विद्यापीठात मराठी व संस्कृत विषयांचा व्याख्याता. १९६१ ते १९६८ काशी हिन्दू विश्वविद्यालयात मराठीचा व्याख्याता. १९६८ ते १९८५ तेथेच प्रपाठक व १९८५ ते १९९३ तेथेच प्राध्यापक. १९९३ जूनमध्ये निवृत्त. लेखन व संशोधन : मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांत मिळून ४५ शोधनिबंध व ९५ लेख. १९६० ते २००० ह्या चाळीस वर्षांत स्वतंत्र व भाषांतरित मिळून २४ पुस्तके प्रकाशित. प्रमुख पुस्तके अशी : औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा; भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रान्ति : प्रथम युग; काव्य, शास्त्र व संस्कृती; विचार और विवेचन; The Doctrine of the Tantrayuktis; काव्यसूत्रसंहिता; ललितलेखन व शैली; ज्ञानेश्वरीचा शास्त्रीय अभ्यास; वाग्विलास; भाषा, साहित्य व

शास्त्र : काही विचार; शैलीशास्त्रज्ञ भामह; शाकुंतल शैलीशास्त्रीय अभ्यास; Bhāmaha's Kāvyālankāra A Stylistical and Methodological Study.

पारितोषिके व पुरस्कार : भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार (१९८१). त्याखेरीज महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, उत्तर प्रदेश हिन्दी संस्थान, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, महाराष्ट्र साहित्य परिषद, ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्था, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद ह्या शासकीय, शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांचे मिळून अठरा पुरस्कार व पारितोषिके प्राप्त.

मराठी सारस्वत, खंड दुसरा (अनमोल प्रकाशन, पुणे १९९२), Reference Asia, vol.VII (Rifacimento International, Delhi, 1992), Biography International (Delhi, 1993), International Directory of Distinguished Leadership (ABI, USA, fifth ed. 1994) इत्यादी संदर्भदर्शिकांत व्यक्ति-परिचय प्रसिद्ध.

माझे धाकटे बंधू : श्री. यशवंत केशव लेले (जन्म - मुंबई, २० जुलै १९३७).

भारतीय आयुर्विमा महामंडळात ४० वर्षे सेवा. निवृत्तीच्या वेळी वरिष्ठ शाखा प्रबंधक (Senior Branch Manager) हा हुद्दा. नंतर तीन वर्षे मॉरिशसमधील एका खाजगी संश्रिम विमा कंपनीत सरव्यवस्थापक म्हणून कार्य. तेथून १९९८ साली भारतात परत आल्यापासून आजतागायत जे.बी. बोडा अॅण्ड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड ह्या विमादलाली करणाऱ्या आशियातील अग्रगण्य संस्थेत सल्लागार म्हणून कार्यरत. त्यांच्यावर पुढील कार्यालयीन जबाबदाऱ्या आहेत : भारतातील अनेक कंपन्यांच्या सानुग्रह निधीच्या (gratuity fund)व रजेचे रोखीत रूपांतर करण्याच्या दायित्वाचे (leave encashment liabilities) विमाशास्त्रीय मूल्यनिर्धारण करणे; केनिया, मॉरिशस व नेपाळ या देशांतील आयुर्विमा कंपन्यांच्या आयुर्निधीचे (life fund) मूल्यनिर्धारण (valuation) करणे तसेच आफ्रिका, मध्य आशिया व आशिया येथील सरकारी व खासगी कंपन्यांना आयुर्विमा धंदा सुरू करण्याच्या बाबतीत तांत्रिक सल्ला (technical consultation) देणे.

❑❑

# संदर्भ-टीपा

१. अ. दि इण्डियन डेली मेलने आपल्या ११ नोव्हेंबर १९२६ च्या अंकात फडक्यांच्या कलाप्रदर्शनाची प्रशंसा मुक्तकंठाने खालील शब्दांत केली होती :

"The tenth Annual Exhibition of Professor Phadke's Fine Art Works was opened at Rambag near C.P. Tank last week. These exhibitions given by the talented Artist often closely depicting current events of national interest have become an annual event which is eagerly awaited by the public of Bombay. Professor Phadke's merits as a sculptor are highly appreciated by the critical art world and these exhibitions organized for the general public are becoming more and more popular and will be remembered by posterity. Some of his works which were exhibited at Wembley last year are now being shown at the International Exposition Philadelphia and have elicited high admiration."

ब. हीच भावना क्रॉनिकलनेही नोव्हेंबर १९२६ अंकात पुढीलप्रमाणे व्यक्त केली होती :

"To the art lovers of Bombay the Diwali is not complete without its customary accompaniment, the fine art exhibition organised by Mr. Phadke the popular local sculptor. His artistic clay and wax models have in the years past drawn large crowds in Bombay. Last year he won much praise in England for his exhibits at Wembley."

२. नवाकाळ, मुंबई, १०.२.२७ मधील माझ्या वडिलांची मुलाखत.

३. द. वा. बर्वे, अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन (लेख), उत्तरार्ध (प्रकाशन तपशील अनुपलब्ध)

४ ते ९ तत्रैव

१०. वरील संदर्भटीप २

११. वरील संदर्भटीप ३

१२. Sesqui Demolition to start Jan. 1, Philadelphia Inquirer (तारीख, महिना व सन अनुपलब्ध) मधील तपशिलाच्या आधारे.

१३. वरील संदर्भटीप २

१४. महात्मा गांधी येरवड्याच्या तुरुंगात असतानाच त्यांचे अॅपेंडिसायटीसचे ऑपरेशन कर्नल मॅडॉक याने १२.१.१९२४ रोजी केले होते. ती घटना फडके यांनी पुतळ्यांच्या स्वरूपात आपल्या प्रदर्शनात मांडली होती.

१५. वरील संदर्भटीप २

१६. तत्रैव

१७. केशवराव लेले ह्यांचे आगमन, केसरी, पुणे ५.२.१९२७

१८. वरील संदर्भटीप २
१९. तत्रैव
२०. 'To Reopen Exhibition

'Mr. K.B. Lele, manager of the Phadke's Fine Art Works of India, who has been in charge of the India exhibit at the Sesqui-Centennial Exhibition in Philadelphia, also arrived on the Majestic. He asserted that the Exposition officials had decided definitely to reopen the Exposition next spring to run throughout the summer and fall. "We shall return for the reopening", he said, "We have found that the Americans are so interested in our art work that we plan to open a plant in America similar to the one we operate in India."

'Atlantic is smooth. Majestic has an Excellent Voyage -

'Art Expert says Sesqui is to Reopen.'

- New York Herald, Paris, 8.1.1927

२१. केसरी, पुणे, ५.२.१९२७; नवाकाळ, मुंबई ६.२.१९२७
२२. फिलाडेल्फियाच्या विराट प्रदर्शनाची खरीखुरी फलश्रुती व त्या प्रदर्शनाचा माझ्या वडिलांना झालेला लाभ याचे जणू एखाद्या मनकवड्याप्रमाणे यथार्थ वर्णन मुंबईच्या 'क्रॉनिकल' ने आपल्या १४.१०.१९२७ च्या अंकात खालील शब्दांत केले होते :

"As a result of the opportunities personally offered to Mr. K.B. Lele at the world famous Wembley and the Philadelphia exhibitions in the years 1925 and 1926, he has been able to study in detail, their formation, working and general utility. It has been observed by experience that these exhibitions, were meant not only to provide more means of recreation and pleasure but also to make a stir in the public at large for the advancement of art and science more easily and to educate them as regards the state of their country in comparison with others."

२३. vide 200 years Calendar 1850 To 2050 compiled by K. A. Bhise, Kamalakant Bhise Enterprises, Talegaon, 5th September 1975
२४. 'कुंभकोणम येथील लोकांनी प्रदर्शन तेथे बोलाविले आहे.' केसरी, पुणे २५.६.२९
२५. नवा काळ ४.२.१९३१
२६. Karachi Khadi Exhibition Bulletin, No. 11-12, 29.3.1931
२७. अहमदाबादच्या गुजराती वृत्तपत्रांतील कात्रणांच्या आधारे.
२८. नवा काळ, मुंबई, मंगळवार ८ फेब्रुवारी १९२७
२९. लेले-कुल-वृत्तान्त, संपा. मुकुंद हरी लेले, मु.ह. लेले, मुंबई, १९४९, पृ. ४७०

❑❑

१८. [illegible]

१९. [illegible]

२०. [illegible]

"Mr. Lee, manager of the Indian Fine Art Works of India, who has been in charge of the India exhibit at the Sesqui-Centennial Exhibition in Philadelphia also [illegible]. He asserted that the Exposition officials had decided [illegible] to [illegible] throughout [illegible]. "We shall return to [illegible]", he said. "We have found that the Americans are so [illegible] that we plan to open a place in [illegible] as we [illegible] in India."

Atlanta [illegible] Vowghan [illegible]

[illegible] (a Report [illegible])

[illegible] 1929 [illegible] International Exposition [illegible]

२१. [illegible]

२२. [illegible]

[illegible]

[illegible]

"As [illegible] the opportunities [illegible] Mr. [illegible], late at the [illegible] Wembley and the Philadelphia exhibitions in the years 1925 and 1926, he has been able to study in detail [illegible] working and [illegible] were [illegible] not only to provide [illegible] but also to make a [illegible] to the public at large for the [illegible] more easily and to educate them as regards the state of their country in comparison with others."

२३. vide 200 years Calendar 1850 To 2050 compiled by K. A. Bhosle [illegible]

[illegible] Sesqui Centennial [illegible]

२४. [illegible]

२५. [illegible] ४.३.१९२९ [illegible] २६.


[illegible]

[illegible]

२८. [illegible]

२९. [illegible]

# शिल्पकार कै. के. बा. लेले यांना मिळालेली सुवर्णपदके




1. The International (fifth) Exhibition 1927-28, Bombay Wax Works, Bombay, २. राजाबहादूर नागपूर १९२८, 3. South Indian Athletic Association Ltd., 1928-29, Awarded to Lele's Wax Works, 4. The National Health Association of Southern India Health Week 1929, ५. स्वदेशी प्रदर्शन अहमदनगर १९३१, 6. All India Swadeshi Exhibition Trichy 1932, 7. The All India Swadeshi Exhibition Madura 1933, 8. Mahamakham All India Swadeshi Exhibition Kumbakonam 1933, 9. All India Exhibition Amritsar 1934